परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज
अंक ११४ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०१८
Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा सस्नेह नमस्कार.***

मंडळी, वैशाख वणव्याने वसुंधरा तापली आहे. उकाडा वाढून अंगाची लाही लाही होते आहे. कधी एकदाचा पाऊस पडतो म्हणून पावसाळ्याची आतुरतेने वाट पाहात आहोत. नाही म्हणायला हापूस आंब्याचा आमरस, चाफ्याच्या-मोगऱ्याच्या फुलांचा सुगंधी दरवळ, गाण्याची मैफल, थंड पाण्याच्या आंघोळी, पोहणे, मोकळ्या हवेत फिरणे, गच्चीवर झोपणे यासारख्या गोष्टी उन्हाळा सुसह्य करायला मदत करतात. असो. आपल्या 'हितगुज' अंकात प्रबोधन आणि मनोरंजन यात सुरेख समतोल साधला जावा याकडे मी लक्ष देत आहे. त्यासाठी साहित्याची निवडही तशीच करावी लागत आहे. आपले मराठे परिवारातील कुलबांधव आपल्या भावनांना मोकळी वाट करून लिहित आहेत, हे स्वागतार्ह आहे. या अंकात, स्पिती व्हॅलीचा प्रवास हा सौ. अनिता मराठे-मुरुडकर यांनी लिहिलेला लेख चित्तथरारक, रोमांचकारी आहे. 'खिडकी' आणि 'माझ्या जीवनातील वसंतबहार' हे मायलेकींनी लिहिलेले दोन्ही लेख उत्तम ललित साहित्याचा नमुना आहेत. 'खिडकी' लेख वाचताना, खिडकीची जागा बसायला हवी, दऱ्या नि खोरी पाहायला हवी, मला मात्र नेलं नाही सांगते तुला, दख्खनच्या राणी तू नेतेस का मला? ह्या बालगीतातील ओळी आणि 'मेरे सामनेवाली खिडकीमे एक चाँद का टुकडा रहता है।' ही गाणी ओठावर गुणगुणत होते.

मंडळी, (बडोदा) 'संमेलनाने आम्हाला काय दिले?' या विषयावर खास स्पर्धा आयोजित केली होती. फक्त चारच निबंध आले. हाताला पाच बोटे असतात, तेवढेही निबंध आले नाहीत म्हणून वाईट वाटले. या अंकात विजयी स्पर्धकांची नावे आणि

## हार्दिक अभिनंदन

**निर्णय : खास स्पर्धा संमेलनाने आम्हाला काय दिले?**

- **प्रथम क्रमांक : १५००/- रु.**
  सौ. शुभदा दीपक मराठे, गोवा पृ. ५३३
- **द्वितीय क्रमांक : १०००/- रु.**
  सौ. आदिती उपेंद्र मराठे, पनवेल
  सौ. हेमांगी सचिन जोशी, पृ. ४२२
- **तृतीय क्रमांक : ५००/- रु.**
  श्री. अनंत मराठे, अंधेरी (प.)

**सर्व विजेत्या स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन**

**दहावी व बारावी परीक्षांचे निकाल आले आहेत. पदवी परीक्षांचेही यथावकाश येतील. या परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन. या विद्यार्थ्यांसाठी प्रतिष्ठानने भरघोस पारितोषिके ठेवली आहेत. त्याविषयी अधिक माहिती पृष्ठ क्र. १८ वर आहे. सर्व पारितोषिक पात्र विद्यार्थ्यांनी दि. ३१ जुलै २०१८ पर्यंत गुण पत्रिकेची प्रत इमेलने/प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पत्र पाठवून संपर्क साधावा.**
**ई-मेल :** info@marathepratishthan.org **किंवा** admin@marathepratishthan.org

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

त्यांचे लेख प्रकाशित केले आहेत. स्पर्धकांनी प्रामाणिकपणे आपली प्रतिक्रिया संमेलनाविषयी दिली आहे. संमेलनाला उपस्थित नसलेले आपले कुलबांधव श्री. संजय रामचंद्र मराठे यांनी संमेलनावर लिहिलेली एक व्यंगात्मक छान कविता या अंकात प्रकाशित केलेली आहे. वाचकांना ती निश्चित आवडेल. श्री. नंदकुमार मराठे यांचा 'अधिकस्य फलं अधिक' हा लेख परिपूर्ण म्हणून वाचनीय आहे. दि. २८ मे ला स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती आहे. त्या निमित्ताने 'सद्गुणविकृती सोडली तर हिंदु समाज विजयी होईल' हा लेख प्रकाशित करून औचित्य साधले आहे. कै. श्री महादेव हरी चक्रदेव हे वधुवर संशोधन कल्पनेचे मूळ प्रवर्तक कसे ठरतात आणि त्यांचे व्यक्तिचित्र श्री. अच्युत महादेव यांनी जिवंतपणी सजीव साकारले आहे. सौ. राधा श्रीकांत मराठे यांनी कार्यक्रमासाठी केलेल्या सूचना महत्त्वाच्या असून त्यासंबंधी विचार करून त्या कृतीत कशा आणता येतील हे पाहणे आवश्यक ठरेल. सौ. मीनाताईंनी, 'सासूबाई? नाही आई' (कै. लीलाताई विष्णू मराठे) या अत्यंत चांगल्या, उत्कट संवेदनक्षमतेने लिहिलेला लेख वाचून प्रत्येक सूनेला आपल्यालाही पुढील जन्मी अशा सासूबाई मिळाल्या हव्यात असे वाटले नाही तर नवलच! मीनाताईचे भाग्य थोर किंवा गेल्या जन्माची पुण्याई म्हणून त्यांना अशा सासूबाई लाभल्या. असो.

'साभार पोच' म्हणून लेखकांनी लिहिलेल्या, स्वखर्चाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची नावे, पत्ते, दूरध्वनी दिले आहेत. तरी कुलबांधवांनी त्यांच्याशी संपर्क साधून पुस्तके खरेदी करून वाचावीत व त्यावरचा अभिप्राय त्या लेखकांना, तसेच 'हितगुज'साठी अवश्य कळवावा. 'हितगुज'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.

दरवर्षीप्रमाणे या अंकात गुणवत्ता पारितोषिकांसाठी आवाहन करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिका अंतिम दिनांकाच्या आत पाठवाव्यात ही विनंती.

*'शतेषु जायते शूरः। सहस्त्रेषु च पंडितः।*
*वक्ता दससहस्त्रेषु। दाता भवति वा न ना।।*

असे संस्कृत सुभाषित आहे. त्याचा अर्थ असा, शंभरामध्ये एखादा शूर असतो. हजारात एखादा पंडित असतो, दहा हजारात एखादा वक्ता होतो पण दानशूर व्यक्ती होते किंवा होतच नाही. दाता म्हणजे देणारा. देणाऱ्या व्यक्तीची 'वानवा'च असते. पण मंडळी यालाही काही व्यक्ती अपवाद असतात. आपले प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. रमाकांत माधव विद्वांस यांनी बॉम्बे प्रार्थना समाज संचालित पंढरपूर येथील बलिकाश्रमास भरघोस देणगी देऊन तसेच आपल्या पश्चात याच संस्थेच्या शिरूर व पंढरपूर अशा दोन्ही बलिकाश्रमांना आणखी भरघोस देणगीची तरतूद आपल्या मृत्युपत्रात करून आपले दातृत्व सिद्ध केले आहे. मराठे परिवारातील दानशूर अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांना हार्दिक अभिवादन. देणगी देऊन त्यांनी आपली प्रिय पत्नी शुभा व मातापिता कै. मालतीबाई व माधव उपाख्य देवदत्त श्रीनिवास विद्वांस यांची स्मृती चिरंतन, अमर केली आहे. त्यांच्याबाबतीत, 'देता, देता, देणाऱ्याचे हात घ्यावे' असे दातृत्वाचे हात घेण्याचे बळ आणि देण्याची दानतवृत्ती आपल्यात निर्माण व्हावी ही भावना व्यक्त करते. विशेष म्हणजे 'अधिकस्य अधिकं फलं' अशा अधिक महिन्यात 'हितगुज'चा जून २०१८ अंक प्रकाशित होत आहे. असो.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. ५ मे २०१८)



**'मराठे प्रतिष्ठान'चे अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस आपल्या आई-बाबांचे म्हणजे कै. सौ. मालतीबाई आणि श्री. माधवराव तथा देवदत्त विद्वांस यांचे फोटो देताना. अध्यक्षांच्या दोन बहिणी डॉ. वसुधा आपटे व पद्मा ठाकूर आणि संस्थेचे पदाधिकारी**



**कै. सौ. शुभा रमाकांत विद्वांस**

***(संबंधित वृत्त पृष्ठ २०वर पाहा)***

# संवाद कुलबांधवांशी

• हेमंत अरुण मराठे, (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

नमस्कार,

कुलबांधव आणी कुलभगिनी.

मंडळी मार्चच्या 'हितगुज'मधील संवादामधे आपण बडोदा येथील ७ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या ११व्या अखिल भारतीय संमेलनावर चर्चा केली. त्यावेळी पुढील संमेलनाचे गया येथील आमंत्रणाबद्दल आपली मते मागितली होती, मात्र अद्याप आपले अभिप्राय आले नाहीत. तेव्हा आपण अजूनही आपली मते जरुर पाठवावीत. म्हणजे पुढील गोष्टी ठरवणे सोपे जाईल.

कुलबांधवांनो आम्ही आपणास आवाहन केले होते की वेगवेगळ्या विभागात आपण जेथे रहात असाल तेथे असलेले मराठे कुलबांधव वारंवार एकत्र येत चला व काही ना काही उपक्रम करत चला व ह्या बातम्या हितगुजसाठी जरुर पाठवा. तेव्हा जर काही असे उपक्रम आपण करत असाल तर जरुर पाठवा, तसेच जर अद्याप सुरू केले नसतील तर जरुर सुरू करा. मंडळी आपण एकत्र येत रहाणे आपल्या परिवाराच्या एकोप्यासाठी आवश्यक आहे, तसेच पुढील पिढीला नातेसंबंधांची माहीती असणे हेही गरजेचे आहे. शिक्षण, करिअर हे अव्याहत सुरुच असणार आहे. परंतु नातीगोती जपणे, स्नेहबंध वाढणे हे समाजाच्या निकोप वाढीसाठी आवश्यक आहे. मंडळी खरच विचार करा, लग्नकार्याच्या वेळी बरेचजण एकमेकांना खूप वर्षाच्या अंतराने पुन्हा भेटतात, त्यावेळी किती छान वाटतं की नाही? तसच आपल्या परिवारातील मंडळी या संमेलनावेळी एकमेकांना भेटतात त्यावेळी किती मजा येते याचा अनुभव जे नेहमी येतात ते अनुभवतातच. असो!

मंडळी आपल्या 'हितगुज'साठी आपल्याच परिवारातील बरेचजण आता लिहिते झालेत, त्यामुळे खूप छान वाटतं. बाकीच्यानीही प्रयत्न करायला हरकत नाही.

आता उन्हाळ्याची सुट्टी संपून बरेचजणांना दहावी, बारावी, पदवी तसेच पदवीका या अभ्यासक्रमांच्या निकालाची प्रतिक्षा लागली असेल. आपल्या पाल्यांचे कौतुक आपणच पर्यायाने परिवाराने केल्यास मुलांना खूप आनंद होतो. तेव्हा ज्यांची मुले या विभागामधे आहेत त्यांनी त्यांचे निकाल आवर्जून 'मराठे प्रतिष्ठान'कडे कळवावेत. पोस्ट, कुरिअर अथवा इमेल कोणत्याही माध्यमाचा वापर करावा. प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थी गुणगौरव केला जातो. त्यासाठीची माहिती याच अंकामधे दिली आहे. त्यात दिलेल्या नियमावलीप्रमाणे अर्ज मुलांनाच पाठवायला सांगा. या व्यतिरिक्त जर काही कोणी वेगळ्या क्षेत्रामधे उल्लेखनीय यश मिळवलं असेल किंवा कार्य केले असेल तर जरूर कळवा, सदर बातम्या 'हितगुज'मधे आवर्जून छापल्या जातील.

मंडळी 'मराठे प्रतिष्ठान'तर्फे आपण गरजू विद्यार्थ्यांना आपल्याकडे असलेल्या निधीतून काही मदत देत असतो. गत आर्थिक वर्षात म्हणजे २०१७-१८ मध्ये आपण आर्थिक दृष्ट्या गरजवंत असलेल्या ९ विद्यार्थ्यांना एकूण रु. ९५,०००/- ची शैक्षणिक मदत केली आहे. जर आपल्या नजरेत अशी काही मुलं आहेत जी हुशार आहेत, मात्र पैशाअभावी त्यांचं शिक्षण थांबतय तर त्यांना जरुर अर्ज करण्यास सांगा. आमच्या निधीच्या उपलब्धतेनुसार नक्कीच मदत केली जाईल. मात्र परदेशी शिक्षणासाठी लागणारी रक्कम मोठी असल्याने त्यांना आपण मदत देऊ शकत नाही, तरीही जर अशीही काही गरजू मुलं असतील तर त्यांना परिवारातील जाणकारांकडून मार्गदर्शन जरूर मिळेल.

कुलबांधवानो, आपण वारंवार आवाहन करतोय की आपल्या कुटुंबाची अद्ययावत माहिती कुलवृत्तांतासाठी जरूर पाठवावी. या साठीचे forms गुढीपाडवा शुभेच्छांसह पाठवले होते. आजवर केवळ ७० forms भरून आमच्यापर्यंत पोहोचले आहेत. प्रतिष्ठानचे जवळपास १३०० सभासद आहेत हे लक्षात घेता हा प्रतिसाद खूपच तुटपूंजा वाटतो. तरी ज्यांनी अजून ही माहिति पाठवली नसेल त्यांनी आपल्या कुटुंबातील विशेषतः १९९० नंतर जन्मास आलेल्या सदस्यांची संपूर्ण माहिति विहित forms मध्ये भरून त्वरित प्रतिष्ठानच्या पत्त्यावर किंवा admin@marathepratishthan.org या ई-मेल वर पाठवावी. असा form मिळाला नसल्यास/गहाळ झाला असल्यास वरील ई-मेल वर कळवल्यास ई-मेलद्वारे तो पाठविला जाईल. तो भरून त्वरित पाठवावा. कुटुंबामध्ये कोणाचा जन्म अथवा मृत्यु झाल्यास त्याचीही माहिति वेळीच कळवा. मृत व्यक्तींचे आजीव सभासदत्व रद्द होत असले तरी त्यांच्या वारसांनी सभासदत्व स्वीकारावे व प्रतिष्ठानशी असलेले ऋणानुबंध कायम ठेवावेत अशीच आमची धारणा असते. त्यामुळे सभासदत्वाचा अर्ज ई-मेल द्वारे मागवून अशा व्यक्तींनी प्रतिष्ठानचे सभासदत्व स्वीकारावे ही कळकळीची विनंती.

उन्हाळी सुट्ट्या संपून आता पुन्हा शाळा, कॉलेज गजबजू लागतील. सर्वाना म.प्र. तर्फे शुभेच्छा. येणारा वर्षा ऋतू सर्वांना आनंददायी जावा ही प्रार्थना करून आपली रजा घेतो. ♦

प्रथम पारितोषिक प्राप्त लेख

# बडोदे संमेलनाने आम्हाला काय दिले?

• सौ. शुभदा दीपक मराठे, (पृ. ५३३), गोवा

**११**वे अखिल भारतीय मराठे कुल संमेलन, गुजरातमधील बडोदे नगरीत, रविवार दि. ७ जाने. २०१८ रोजी भरले. नटराज मंगल कार्यालय, दांडिया बाजार बडोदे येथे संपन्न झालेल्या या संमेलनाने आम्हाला 'खूप' काही दिले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

याच्या आधीची १० संमेलने विविध राज्यातून विविध भागातील कुलबांधवांनी जबाबदारी घेऊन भरविली. प्रत्येक संमेलनातून आम्ही काही ना काही गोष्टी शिकलो.

याही संमेलनाची काही वैशिष्ट्ये आहेतच. सर्वप्रथम या निमित्ताने बडोदानगरी आणि आसपासचा परिसर पाहायला मिळाला, हे आमचे भाग्य.

'मराठे कुलबांधवांची' संस्था काढावी या विचाराने १९७९ साली याच बडोद्यात बीज रूजले. त्याच ठिकाणी आज ११वे मराठे कुलसंमेलन संपन्न व्हावे हा केवळ योगायोग नसून बडोदेकर मराठ्यांची ती सुप्त इच्छा होती, धारणा होती, एक चांगला विचार होता. ज्या ज्येष्ठ/श्रेष्ठ बांधवांनी या विचाराचे बीज रोवले होते. त्यातील एक संस्थापक बांधव श्री. वा. ग. मराठे हे या संमेलनाला उपस्थित होते, हा खरोखर मणिकांचन योग होता.

संमेलनाला त्यागमूर्ती वसंत मराठे यांच्यासारखे अध्यक्ष लाभले, आणि त्यांचे अमूल्य विचार ऐकायला मिळाले, हे विशेष. अतिथी विशेष श्री. रवींद्र मराठे, अतिशय विनम्र स्वभावाचे होते.

समितीचे अध्यक्ष श्री. मोहन मराठे, निवेदिका सौ. अजंली अशुतोष- अशी किती नावे घ्यावीत. सगळेच आपापल्या कार्यात तत्पर आणि मृदुभाषी होते. हे ध्यानी ठेवण्यासारखे.

अगदी प्रकर्षाने विचारात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे २९ इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या माहेरवाशिणी (आजपर्यंतच्या संमेलनात न घडलेली गोष्ट) माहेरच्या ओढीने आलेल्या शिवाय पाहुण्यासारख्या न बसता स्वागतापासून गरबा नृत्य करण्यापर्यंतच्या सर्व कार्यक्रमात सहभागी होऊन घरच्याच बनल्या होत्या. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

यापुढे मराठ्यांच्या माहेरवाशिणीनी ही गोष्ट उचलून धरावी व पुढील संमेलने गाजवावी, असे सांगण्याचा मोह इथे आवरता येत नाही.

सकाळी ठीक आठ वाजता सनईच्या सुरेल स्वरांच्या साथीने कुलबांधवांच्या नोंदणीला आणि स्वागतालाही सुरुवात झाली. सुगंधित अत्तराची कुपी ज्यात आहे, असे सोनचाफ्याचे कलात्मक फूल व बडोद्याचा प्रसिद्ध पेढा देऊन सुहास्यवदनाने कुलभगिनीनी केलेले स्वागत, सोबत बडोदा नगरीत जे जे मराठे उद्योजक आहेत त्याची झलक त्यांनी न सांगताही त्यांनी दिलेल्या भेटवस्तूंमधून दिसून आली. नेहमीच्या वापरातल्या या उपयुक्त भेटवस्तू पाहून अचंबित झाले.

संमेलन सभागृहातील व्यासपीठाची रचना आणि सजावट खूप छान, उपयुक्त होती. दूधात साखर म्हणजे निवेदिकेचे मृदू, मुलायम नेटके निवेदन, सुहास्यवदन प्रेक्षकांना भावले. सगळे कार्यक्रम सुटसुटीत! जाहिराती ओळखा किंवा निशिगंध- अनुराधाचा quiz कार्यक्रम सर्व कुलबाधवांना नकळत सहभागी करून गेला. त्यामुळे जेवणानंतरच्या वामकुक्षीचा आपसूकच विसर पाडण्यास बडोदेकर यशस्वी ठरले.

सासुर-माहेरवाशिणीनी मिळून सादर केलेला गरबा, त्या कार्यक्रमाचे निवेदन, संगीत, प्रत्यक्ष अभिनय, नृत्य, विविधता वस्त्रप्रावरणे, मध्यंतरातले बदल, छत्र्या, चष्मे सर्व काही अप्रतिम छान, सुंदर. कार्यक्रमात चैतन्य कसे आणावे याबद्दल 'गरबा' खूप काही सांगून गेला. इतके की गरब्याची ती रंगीत छत्री मागून घेण्याचा मोह काही आवरला नाही. संमेलनाने सगळ्यात चांगली, उत्तमातली उत्तम गोष्ट कोणती दिली असेल तर ती, स्मरणिका 'स्मृतिगंध' खरोखरच कुलबांधवांच्या कार्याच्या स्मृतीचा सुगंध पसरविणारी, विचार करायला लावणारी स्मरणिका.

मुखपृष्ठही बोलके. आम्हा चित्पावनांचे दैवत परशुराम तसेच बडोद्याच्या मातीत कोणे एकेकाळी अंकुरलेल्या बीजाचा, रोपट्याचा कर्तृत्ववान वटवृक्ष साकारलेला पाहून मन भरून आले. कुलबांधवांविषयी मनोमन कृतज्ञता व्यक्त केली. स्मरणिकेचे अंतरंग ही तितकेच उत्तम बोलके प्रेरणास्रोत जणू 'जेथे जाईन तेथे बाग फुलवीन' या उक्तीप्रमाणे विविध क्षेत्रात स्वतःचा असा ठसा उमटविणारे एक एक दिग्गज कुलबांधव मग ते अमेरिकेत स्थायिक होऊन वेस्ट विंडसर नगरपालिकेचे महापौर होणारे हेमंत मराठे असोत, स्थापत्यशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास करून उत्तमातले उत्तम बांधकाम व्यावसायिक गोविंद मराठे असोत, किंवा विक्रम फॉर्मसी मार्फत विविध प्रॉडक्टस् तयार करणारे विष्णुपंत कृष्ण असोत, प्रिटींग प्रेसवाले कृष्णराव असोत किंवा भजन - तबला प्रेमी शंकरराव असोत किंवा उत्तम लेखक व व्यायामपटू विष्णु वामन असोत. या सर्वांची जिद्द, कष्ट, संयम, सातत्य हे आम्हा

सर्वांना अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारे आहे. प्रतिकूल परिस्थितीतही या बांधवानी जिद्दीने केलेले कार्य पाहून त्यांच्याबद्दल आदरभाव निर्माण झालाच. शिवाय संमेलनाचे औचित्य साधून त्यांच्या कार्याचे मान्यवरांकडून झालेले कौतुक पाहून मन भरून आले. 'स्मृतिगंध' मराठ्यांच्या पुढील पिढीना मार्गदर्शक ठरलीच आहे, शिवाय प्रोत्साहन देणारी प्रेरणादायी ठरली आहे. यात दुमत नाही. 'स्मृतिगंध' स्मरणिका ही या संमेलनाने दिलेली चिरकाल चिरकाल, चिरनिरंतर अशी भेट आहे. जी नव्या पिढीला, उत्साही युवक-युवतीना मोलाचे मार्गदर्शन करू शकणारी अशी आहे.

अशी ही संमेलने खूप काही देऊन जातात. याही संमेलनाने सर्वोत्कृष्ट असे खूप काही दिले. शेवटी जाता जाता एवढेच सांगावेसे वाटते-

*हे बंध रेशमाचे ठेवी जपून जीवा*
*धागा अतुट हाच प्राणांत गुंतवावा*
*बळ हेच दुर्बलांना देती पराक्रमाचे*
*तुटतील ना कधीही हे बंध रेशमाचे*

(या कवियत्री शांता शेळकेंच्या पंक्ती तत्क्षणी आठवल्या) ♦

**द्वितीय पारितोषिक प्राप्त लेख**

# बडोदे संमेलनाने आम्हाला काय दिले?

♦ सौ. हेमांगी मराठे-जोशी, (पृ. ४२२), पुणे    दूरध्वनी : ०२६५-२४३८०७७

११वे कुलसंमलेन बडोद्याचे एक सुखद अनुभव कारण प्रत्यक्ष अनुभवले. १०वे कुलसंमेलन सांगलीला २३, २४ जानेवारी २०१६ला. मी आई-वडीलांसोबत अनुभवले व एका गावाला भेट दिली व त्या गावाच्या आजुबाजुचा प्रदेश पहायची संधी मिळाली. असा माझा तेव्हा समज. ह्या संमेलनाबाबत झाला होता. बडोद्यातील संमेलनाने माझे झालेले समज, गैरसमज दूर झाले कारण माझ्या वडिलांचे (मोहन मराठे) काम मी जळवून पहात होते. ११वे संमेलनाचे आयोजन त्यांच्या करीता विशेष असे काहीच नव्हते कारण ब्राह्मणसभा, बडोदा ह्या संस्थेचा सुवर्ण महोत्सव, हीरक महोत्सव, अमृत महोत्सव, अन्योय व इतर संस्थांचे शताब्दी महोत्सव, १२५ वर्षे झालेल्या संस्थेचा नारायणगुरु तालीमीचा महोत्सव ज्यांनी कुशलतेने व कसलेही गालबोट न लागता यशस्वी करून दाखवले, त्यांना हे ११वे संमेलन म्हणजे विशेष नव्हते. असो. आता ११व्या कुलसंमेलनाची आखणी जी झाली त्यांत शिकण्यासारखे बरेच होते. शिस्तबद्ध आयोजन, क्रमाक्रमाने ज्ञानांत भर पाडणारे कार्यक्रम, संमेलनाध्यक्ष, अतिथी विशेष म्हणून योग्य व्यक्तिंची निवड, सर्व वयाच्या श्रोत्यांना कोणत्या न कोणत्या कार्यक्रमांत सहभागी होता आले. अशी कार्यक्रमांची निवड, वैयक्तिक गुणांची कदर, संघभावना जागृत करणे, आदरातिथ्य जोपासणे, संमेलनशुल्काची परतफेड गाजावाजा न करता खुबीने केली. सांस्कृतिक, कौटुंबिक, मनोरंजन, कलेला प्रोत्साहन असे विविध कार्यक्रम योजून दिवसभर श्रोत्यांना कंटाळा येऊ न देतां मनोगत व्यक्त करण्याची संधी दिली हे फार आवडले. अत्तराचा बोळा असलेले संग्रही टिकाऊ कलात्मक चाफ्याचे फुल २०१८ सालाची रोजनीशी, २०१८ सालाचे कॅलेंडर, गृहपयोगी वस्तुंची भेट व स्मृतिगंध स्मरणिका कि ज्यांत माननीय नरेंद्र मोदी जे भारताचे पंतप्रधान आहेत तसेच गुजरात राज्याचे मुख्यमंत्री श्री. विजय रुपाणी ह्यांचे संदेश मराठे प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती, उद्दीष्टे, हितगुज अंक कशासाठी ह्यांची विस्तृत माहिती कुलदेवतांची माहिती. हितगुजच्या अकांत प्रसिद्ध केले आहे की ११व्या संमेलनाने काय दिले? तर आता मला असे म्हणायचे आहे की वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त काय राहिले म्हणजे आता काय द्यायचे राहिले हे जर १२व्या संमेलानांत कोणी दाखवले तर ती ११व्या संमेलनाच्या यशाची पावती ठरेल असे माझे मत आहे. मी इंग्रजी माध्यमातून शिकले तेव्हा निबंध मराठीत लिहिण्याची सवय नाही तरी कपिगोत्रीय मराठे जाईल, खांबेटे, विद्वांस, साने, चक्रदेव तसेच माहेरवाशिणी यांना तसेच नव्या पिढीला आकृष्ट करणारे, नव्या उमेदीने सहभागी करायला लावणारे संमेलन झाले. ♦

## हसरे हितगुज

इतिहासाचे प्राध्यापक व गणिताच्या प्राध्यापिकेचे भांडण होते.
प्राध्यापक चिडून म्हणाले, पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातील सर्व सैन्य तुमच्यावर सोडेन मी.
प्राध्यापिकाही कमी नव्हत्या.
त्या म्हणाल्या, त्या सगळ्या सैन्याला तुमच्यासह एकाच कंसात घालून शून्याने गुणेन...!

द्वितीय पारितोषिक प्राप्त लेख

# संमेळनाने आम्हास काय दिले?

• सौ. अदिती उपेंद्र मराठे, पनवेल भ्रमणध्वनी – ९९६७५८४५५९

*''देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे*
*घेणाऱ्याने एके दिवशी देणाऱ्याचे हात घ्यावे''*

**'म**राठे प्रतिष्ठान'चे अखिल भारतीय 'मराठे कुलसंमेलन' ७ जानेवारी २०१८, बडोदे गुजरात येथे सयाजीराव गायकवाड यांच्या नगरीत नटराज मंगल कार्यालयात संपन्न झाले.

नावाप्रमाणे अखिल भारतीय मराठे कुल संमेलन जाणवले. कारण भारताच्या कानाकोपऱ्यातून मराठे बंधु-भगिनी जमले होते. माहेरवाशीणीचा मान सासुरवाशीणीनी केला हेच मोठे पारितोषिक होते. कुठलाही नामांकनाचा प्रकार नव्हता, मानांकनाचा तो भाग होता. आपण सर्वांचा मान व आदर करावा ही शिकवण दिली.

आम्ही पनवेलहून खास संमेलनासाठी येण्याचे ठरविले होते. आमचे संमेलनाचे हे पहिलेच वर्ष. दहा वर्ष संमेलनात हजर राहिलो नाही, याची खंत मनात होती. पण जिथे संमेलनाचे बीज रोवले, तेथेच रोप बहरले व त्यास लागलेली गोड फळे चाखण्यास मिळाली.

'सप्तसूर झंकारीत बोले' या नांदीने वातावरण आनंदीत झाले व संमेलनास सुरुवात झाली. नोंदणी, वर्गणी, भेट वस्तू, चहा-नाश्ता असा कार्यक्रम होता. सौ. अंजली मराठे यांचे सु-सूत्र संचालन, शिस्तबद्धता, उत्तम नियोजन असा त्रिसूत्री कार्यक्रम झाला.

मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्यासह बडोदा नगरीतील प्रतिष्ठित नागरिक, गुजरातचे मा. मुख्यमंत्री विजय रूपाणी साहेब आणि श्री. रमाकांत विद्वास यांचे आशीर्वाद संदेशाच्या माध्यमातून मिळाले. 'मराठे प्रतिष्ठान'चे बीज रोवणारे श्री. वामन ग. मराठे यांचे आशीर्वाद व मार्गदर्शन मिळाले. हे पुढच्या पिढीसाठी खूपच महत्त्वाचे आहे. सर्व जेष्ठ बंधूनी आम्हा सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले. थोरा-मोठ्याने लहानांचे कौतुक करावे म्हणजे उत्साह वाढून प्रोत्साहन मिळते, ही शिकवण मिळाली.

७ जानेवारी २०१८ हा दिवस लक्षात राहिला, कारण तो सोनचाफ्याच्या फुलातून बंद कुपीत सुगंधित झाला होता.

चहा-नाश्ता, जेवण व संध्याकाळचा नाश्ता-चहा याचा विचार केला तर सात्विक आहार मिळाला. गुजराती उंधियुसारख्या पदार्थातून दोन प्रांतातील खाद्य संस्कृतीची देवाण घेवाण झाली. गुजरातचा दांडिया हा सुद्धा कलाविष्कार म्हणजे कलेची देवाण-घेवाण झाली असे वाटते.

एका लहान मुलीला चहाचा चटका लागला तो मात्र सगळ्यांना चटका लावून गेला पण तिच्यासाठी सर्वांनी औषध, मलमपट्टी केली. त्यामुळे सुख दुखात आपण एकत्र येतो याची जाणीव झाली.

संमेलन कसे असावे? सर्वांगसुंदर, शिस्तशीर, स्वागतास सुसज्ज, नियोजनबद्ध, विचारांची देवाण-घेवाण करणारे आणि दुजाभाव न करणारे असे असावे. हे घेण्यासारखे आहे. हे संमेलन पुढील पिढीला संघटित करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी मराठे बांधवाना मदतीचा हात देणारे असे वाटले.

शिकण्यासारखे खूप आहे. घेण्यासारखे खूप आहे. कुठलाही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माणसं किती प्रयत्न करतात, आपला वेळ, पैसा, आणि आपली ऊर्जा खर्ची घालतात हे संमेलनामुळे आम्हाला समजले.

'देणाऱ्याने देत जावे... देणाऱ्याचे हात घ्यावे' म्हणजेच त्यांच्यासारखे काम करावे. असे मार्गदर्शन मिळाले.

कार्यक्रमाचे आयोजन-नियोजन-प्रयोजन याची सांगड कशी घालावी हे शिकण्यास मिळाले.

सांगली येथे आश्वासन दिल्याप्रमाणे श्री. मोहनकाका व त्यांचे सहकारी यांनी बडोदा येथे २०१८चे 'मराठे प्रतिष्ठान'चे संमेलन यशस्वीरित्या पार पाडले. दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी ही जाणीव आम्हाला संमेलनाने दिली. आम्हाला समाधान दिले. आता पुढील संमेलन बहुधा गया येथे. नक्की भेटूया.

♦

## हसरे हितगुज

कुठली मुलगी काय म्हणते...

**मुंबईकर मुलगी** : एक्स्यूज मी

**सांगलीची मुलगी** : जरा सरकता का प्लीज?

**पुण्याची मुलगी** : सरकता का, का तीर्थरुपांना सांगू?

**सोलापूरकर मुलगी** : सरकता का जरा?

**सातारकर मुलगी** : सरक ना भावा...

आणि सगळ्यात टॉप ...

**कोकणी मुलगी** : अरे ए... रस्त्याचो सातबारो काय तुझ्या बापशीच्या नावावर आसा काय ...

चल बाजू

# स्पिती व्हॅलीचा प्रवास

• सौ. अनिता (मराठे) मुरुडकर, (पृ.३६५)



At Last entered a world within a world. A valley of leagues where the high hills were fashioned of the mere rubble and refuse from off the knees of the mountains. Surely the God lives here.

**- Rudyard Kipling**

अप्रतिम निसर्ग सौंदर्याने नटलेल्या स्पिती व्हॅलीबाबत रूदयार्ड किपलिंग ह्या (भारतात जन्मलेल्या) ब्रिटीश लेखकाने हे उद्गार काढले आहेत. ह्या भागातील प्रवास अत्यंत खडतर आहे हे मी ऐकून होते अशावेळी आमचे स्नेही सुरेखा व विलास आंबरे ह्यांनी जून (१७) महिन्यात तेथे जाण्याबद्दल विचारणा केली व मी आणि आशिष ह्यांनी चटकन होकार दिला.

हिमालयातील अचानक बदलणारे हवामान, प्राणवायुची कमतरता, दरडी कोसळण्याचे नित्याचे प्रकार ह्यामुळे एखाद्या जागी दिवस दिवस अडकून पडावे लागल्याने खाण्यापिण्याची तरतूद, गरम कपडे, औषधे आवश्यक असतात. ईशा टूर्सचे आत्माराम परब यांनी आमचा मुंबई-चंदीगड-सिमला-सांगला-नाको-काझा-मनाली-चंदीगड-मुंबई असा १० दिवसाचा प्रवास पक्का केला. थंड हवेत सवय करून जास्ती उंचीवर जाण्याची सोय होती. प्राणवायु कमतरतेवर उपाय म्हणून औषधी कापूर मलमलच्या छोट्या पिशव्या शिवून घेतल्या.

आम्ही दोघे, सुरेखा-विलास, आमचा मित्र नीतीन कीर १६ जून १७ला मुंबईहून चंदीगडला विमानाने गेले. तेथे आमच्या इनोव्हा गाडीचा चालक लकीने आमचा ताबा घेतला. पुढील १० दिवस तो आमचा सर्वेसर्वा रहाणार होता. विलासचा मुलगा साहिल व त्याच्या २ मित्रांचा गट मुंबईहून अगोदर बाईकवर निघाला. आम्ही चंदीगडहून सिमल्याला मुक्कामाला गेलो. सिमला ७४६० फूट उंचीवर आहे.

दुसरे दिवशी आम्ही सांगलाकडे प्रयाण केले. हा २८० कि.मी.चा प्रवास आम्ही सतलज नदीच्या काठाने सफरचंद, शक्करकंदच्या बागा उंच हिमालयाच्या रांगांमधून केला. सतलज नदी तिबेटमध्ये रक्षस्तळ इथे उगम पावते तेथे तिचे नाव लांगेन झांबो (हत्ती नदी) असून ती शिपकी-ला-पास इथे हिमाचल प्रदेशात (भारतात) प्रवेश करते. करच्छम इथे सतलजला बसपा नदी मिळते व आमचा पुढील प्रवास बसपा नदीच्या काठाने सुरू झाला. सांगला (तिबेटी भाषेत प्रकाशाची खिंड-पास ऑफ लाईट) हे ८८५८ फूट उंचीवर असून किन्नोर जिल्ह्यात तिबेट हद्दीवर आहे. तेथे भारतीयांना जाण्याची परवानगी १९८९ पासून देण्यात आली. इथे देवदार, सफरचंद, अक्रोडच्या बागा आहेत. डिसेंबर ते मे हा भाग बर्फमय होऊन पूर्णतः बंद असतो. येथील लोक किन्नोरी (महाभारतातील यक्ष-किन्नरांपैकी) असून ती भाषा बोलतात. आमच्या बाजूच्या डोंगरावरून दरड कोसळून रस्ता बंद झाला होता. रस्त्यावर ठिकठिकाणी दरड कोसळू शकेल. (shooting stone) अशा पाट्या होत्या. खडतर प्रवासात बसपा नदीच्या शुभ्र पाण्याचा खळखळाट उल्हसित करत होता. सांगलाला आम्ही मुक्कामाला पोहोचलो.

## चितकुल (११३२० फूट)

हे चितकुल गाव सांगलापासून २३ कि.मी. अंतरावर असून ११३२० फूट उंचीवर आहे. आम्ही सांगलाहून तेथे गेलो. रस्त्यावर हिमालयाचे रंगीबेरंगी चित्रविचित्र आकाराचे डोंगर होते. पांढऱ्या रंगाची घरे त्यावर काळी स्लेटपाटी, लाकडी फळ्या वा पत्र्यांची छप्परे होती. चितकुलची ग्रामदेवता गंगोत्रीची कुटुंबीय असल्याची लोकभावना आहे. ह्या ग्रामदेवाला (पालखीतून) गंगोत्रीला डोंगरातून पायी घेऊन जातात. चितकुलची हॉटेल्स महागडी असल्याने प्रवासी सांगलाला मुक्काम करतात. परतताना आम्ही कामरूचा किल्ला पाहिला वरून हिमालयाचे नयनरम्य दृष्य दिसले.

## नाको (१२०१४ फूट)

सांगलाहून आम्ही नाकोला गेलो. ते १२८ कि.मी. अंतरावर असून १२०१४ फूट उंचीवर आहे. आम्ही करच्छम विद्युत प्रकल्पाची पुलावरून दुसऱ्या दिशेने गेलो. रस्ता अधिकाधिक छोटा होत होता. रस्ते दुरुस्ती व ठिकठिकाणी शूटिंग स्टोनच्या पाट्या होत्या. सुरुवातीला सफरचंद बागा, सूचीपर्णी वृक्ष होते. पण विरळ होत गेले. स्पिती व्हॅली हे थंड वाळवंट म्हणून ओळखले जाते. एके ठिकाणी स्पिती नदी व सतळज नदी ह्यांचा संगम झाला आहे. त्याला खाब म्हणतात. येथपासून हंगरांग दरी सुरू झाली. नाकोची सुरुवात येथून होते. इथे भेटलेली स्पिती नदी आम्हाला पुढे काझापर्यंत साथ देणार होती. नदीचा प्रवाह राखाडी रंगाचा दिसतो. कारण तो आपल्या बरोबर राखाडी रंगाचा गाळ आणतो. डोंगरावर नदीच्या प्रवाहाच्या लाटा आपटून गुहा तयार होतात.

खूप उंचीवर वनस्पती कमी होऊन डोंगर ओडकेबोडके वाटत होते. आता पिवळ्या चोचेचे चक पक्षी थव्याने दिसू लागले. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन (BRO) चे जवान रस्त्यांची डागडुजी करतात ते आपले खरे Brothers वाटतात. रस्त्यावर सतत दगड पडतात. BRO आपली काळजी घेतात. रस्ते दुरुस्तीच्या कामात विशेष लक्ष वेधून घेणारी बाब म्हणजे महिला ह्यात आघाडीवर आहेत. कुदळीने त्या रस्ता खणतात. मातीतील दगड कडेला एकमेकांवर व्यवस्थित रचतात. पाठीवर किंवा बाजूला लहान मूल असतेच. ही मुले वाहनांना Bye Bye करत असतात. सतलज-स्पिती खाबपासून तुम्हाला दुसऱ्या जगाची जाणीव व्हायला लागते. खाब पुलावरून तुम्हाला हिमाचलमधील सर्वात उंच शिखर रिओ पुरग्यालचे दर्शन होते. त्याची उंची २२३६२ फूट आहे.

दुपारी ४च्या सुमारास आम्ही नाको ह्या अद्‌भुतरम्य गावाला पोहोचलो. वेशीवर खूप झाडे लावली होती. आमचे लेक व्यू हॉटेल शोधायला बराच वेळ लागला. पोहोचल्यावर आमचे बुकिंगच नसल्याचे कळल्याने पेचप्रसंग निर्माण झाला. बरीच हुज्जत घातल्यावर कळले की इशा टूर्सच्या एका को-ऑर्डिनेटरच्या नावाने खोल्या बुक झाल्या होत्या. पण प्रसंग निभावला. समोर छान तलाव होता. नाको गाव आधी दुसरीकडे वसले होते. पण भूकंपामुळे ते इथे हलवण्यात आले. गावामध्ये सर्वत्र दगडांवर किन्नोरी भाषेतून मंत्र लिहिले होते. पूर्वजानी लिहिलेले मंत्र त्यांनी गावभर पसरून ठेवले होते ते पण नीट रचून ठेवले आहेत. जतन करण्याची पद्धत अजब वाटली. दगड कोणीही उचलून नेऊ शकतो असा विचार आमच्या मनात आला. तो त्यांच्या पूर्वजांच्या मनात आला नाही का? गूढ वाटले. नाको गाव निसर्गसौंदर्याने नटले आहे. सर्व घरे दगडी आहेत. दगडांचे कुंपण आहे. घरात गाई, एका कुंपणात तर शेळ्यामेंढ्या दुसऱ्या दगडी कुंपणात. घरे अगदी स्वच्छ वाटली. गावात फेरफटका मारून आम्ही मोनॅस्ट्रीकडे गेलो. वाटेत एका घराच्या ठिकाणी भित्तीचित्रे (frescos) आहेत असे कळल्याने आत गेलो. तेथे बुद्धाची भित्तीचित्रे - पेंटिंग्ज - पाहिली. वनस्पतींचे रंग वापरले आहेत. ही चित्रे ५०० वर्षाइतकी जुनी आहेत. इथून पुढे एका घरात इ.स. १०२५ (११वे शतक) ची भित्तीचित्रे आहेत असे कळले पण घर बंद असल्याने ती बघावयास मिळाली नाहीत. १९७५ मध्ये इथे भूकंप होऊन बरीच पडझड झाली. मोनॅस्ट्रीला धक्का बसला. १९९८ मध्ये ती पडण्याच्या अवस्थेत होती. पण ऑस्ट्रियामधील व्हीएन्ना विद्यापीठ, नाको बुद्धिस्ट असोसिएशन व इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चर या तीन संस्थानी मिळून तिची पुनर्बांधणी (Restoration) केली. परतण्यापूर्वी आम्ही बुद्धिष्ट चक्रांना भेट दिली. आमचे फोटो काढले. दोन छोट्या मुली मजेत चालल्या होत्या. आम्ही त्यांचे फोटो काढत होतो. त्या एकदम लाजल्याबुजल्या. अती थंडीमुळे त्यांच्या गोलगुबऱ्या गालांची त्वचा भाजून निघाली होती. परततांना आम्ही तळ्याभोवती निसर्ग सौंदर्य न्याहाळले. निसर्गाने नाकोवर अगदी प्रेमाने सौंदर्याची उधळण केली आहे असे वाटते. हिमालयातील सर्व प्रवासात ती उत्तुंग शिखरे, अस्ताव्यस्त पसरलेल्या खोलखोल दऱ्या, खोऱ्यातील गोलगोल पांढरे शुभ्र राखाडी दगड, निरनिराळ्या रंगाचे अभ्रकाचे दगड, ठिकठिकाणी निर्झर, त्यांच्या दगडावर आपटून होणारा मधुर नाद, खळखळाट, हे सर्व तुम्हाला तुमच्या अस्तित्वापलीकडच्या अस्तित्वाची जाणीव सतत करून देते. आपण ह्या उत्तुंग शिखरापुढे किती क्षुद्र आहोत असे वाटायला लागते. प्रत्येक डोंगर वेगवेगळ्या आकाराचा, मधूनच थोडी रानटी झाडे, त्यात गुलाबी, पिवळ्या, कोनफळी, लाल, पांढऱ्या रंगाची पूर्ण उमललेली फुले मोहात पाडतात. डोंगरामधूनच मातीचे रस्त्यावर आलेले सुळके घोळक्यामध्ये उभे दिसतात. तर त्या सुळक्यामधून दिसणारी खोर दरी, त्यातून वाहणारी नदी अशी विहंगम दृष्ये अपार नेत्रसुख देतात. रात्री आम्ही जेवायला बाहेर पडलो तेव्हा प्रचंड जोराचा वारा सुटला होता. बोचरी थंडी सहन होत नव्हती व अंधारामुळे एक अनामिक भीती वाटत होती. सुंदर निसर्ग क्षणात किती रौद्र रूप धारण करू शकतो हे पदोपदी जाणवत होते. रूदयार्ड किपलिंगचे सुरुवातीला उद्‌धृत केलेले वाक्य सार्थ वाटले.

### गुओ - Gue (१०००० फूट)

आम्ही नाको हून नाश्ता करून काझाकडे गेलो. प्रथम मलिंग गाव लागले. घरे सुंदर टुमदार होती. गाव मोठे वाटले. सफरचंदाच्या बागा होत्या. मालिंग नंतर टॅकोकडे जाताना गुअे गाव लागते. येथे १५व्या शतकातील ममीज आहेत. ह्या १०००० फुटावरील गावात ५५० वर्षांपूर्वीची ममी जतन करण्यात आली आहे. एका खोलीत काचेच्या पेटीत ठेवलेल्या ममीचे वैशिष्ट्य म्हणजे ती बसलेल्या अवस्थेत आहे. शरीराचे सर्व भाग नखे, केस सुद्धा अजून जसेच्या तसे आहेत. १९७५ च्या भूकंपानंतर ITB पोलिसांना Resque Opreation मध्ये ही शाबुत अवस्थेत मिळाली. ४५ वर्षाच्या लामाची ही ममी असावी. गावातील स्तुपामध्ये ती बसलेल्या अवस्थेत मिळाली. गावातील लोक ह्याची पूजा करतात. बौद्ध साधूंची ममी बनवण्याची वेगळी पद्धत आहे. साधू जिवंतपणी स्वतःला हळूहळू उपाशी ठेवू लागतात. (प्रायोपवेशन). भात, सातू, बीन्स खाणे बंद करतात. मरणाआधी जळत्या मेणबत्या आपल्या शरीराभोवती फिरवून त्वचा कोरडी करतात. उपाशी राहून बसल्या अवस्थेत मरण पत्करतात- समाधी घेतात. त्यांच्या मरणानंतर त्यांना जमिनीखाली खोलीत ३ वर्षे ठेवतात. तेथे जळत्या मेणबत्यांनी त्वचा कोरडी केली जाते. गेऊ येथील ममी संघा तेन्सीन ह्याची आहे. २००४ मध्ये पोलिसांना

एका थडग्यात ही मिळाली. याच्या गळ्याभोवती व मांड्याभोवती दोरखंड आहे. लोककथा अशी आहे की ह्या गावावर विंचवांचे आक्रमण झाले. त्या वेळी ह्या साधूने लोकाना आत्मक्लेश म्हणून त्याची ममी बनवण्यास सांगितले. तो मरण पावल्यानंतर आकाशात इंद्रधनुष्य दिसले व विंचू गावातून निघून गेले. या ठिकाणी मी भेट दिलेल्या इजिप्तच्या पिरॅमिडमधील ममींची आठवण झाली. राजघराण्यातील मृत व्यक्ती व त्यांची प्रिय कुत्री मांजरी आदिंच्या ममीज त्यांच्या मृत्यूनंतर बनवण्यात आल्या. त्यांचे आयुष्य पुढे चालू रहावे ह्यासाठी हे करण्यात येत असे. मृत्यूनंतर त्यांचे शरीर पिरॅमिड शेजारी, माणसाचे डोके व सिंहाचे शरीर असलेल्या स्फिंक्स ह्या ठिकाणी सोन्याच्या हरणानी ओढलेल्या सोनेरी रथातून नेण्यात येत असे. ह्या ठिकाणी शरीरातील हृदय सोडून इतर सर्व भाग काढून टाकत. ह्या भागावर विशिष्ट रासायनिक प्रक्रिया (Balming) करत. हे सर्व भाग हृदयासहित शरीर वनस्पतींच्या रसामधून मंत्रोच्चाराने काढून रेशमी कापडात गुंडाळून पेटीत ठेवायचे. त्याच्या आवडत्या वस्तु त्याच्या जवळ ठेवायचे. इजिप्तमध्ये राजघराण्यातील व्यक्ती, प्राणी ह्याच्या मृत्यूनंतर ममीज बनवण्यात आल्या.

### टॅबो - १००00 फूट

गुएहून आम्ही टॅबोला प्रयाण केले. हे गाव रेकाँग प्यो व काझाच्या मध्ये वसले आहे. येथील मोनॅस्टरी ९९६ इ.स. मध्ये रिंचेन झांगपो ह्यांनी स्थापन केली. त्यांनी बौद्ध ग्रंथांचे संस्कृतमधून तिबेटी भाषेत भाषांतर केले. झांगपोंचे भारतीय गुरू होते अतीष. आम्ही मोनॅस्टरोला गेलो. येथे ९ देऊळे ४ स्तूप व २३ खोल्या आहेत. माती व लाकडापासून बनवलेल्या छोट्या घरातून ऐतिहासिक खजिना लपला होता. मुख्य देवळात पुरातन भित्तीचित्रांची मेजवानीच मिळाली. वनस्पती रंगांचा वापर होता. बुद्धाच्या जीवनावर आधारित ह्या कथा आहेत. प्रवेशद्वारावर तुमचे स्वागत गणपतीची मूर्ती करते. टॅबो गाव अतिशय थंड वाळवंट ह्या प्रकारात मोडते. बौद्ध राजा येरोओ ह्याने ९९६ इ.स.मध्ये मोनॅस्टरी बांधली. १४६ वर्षांनी जंगनुब ओडी याने डागडुजी केली. त्याकाळी भारतीय पंडीत तिबेटी भाषा शिकण्यासाठी टँबोला राहायचे. इ.स. १८३७ मध्ये लडाखच्या राजाने आक्रमण करून तोडफोड केली. १९७५च्या किन्नोर भूकंपानेही खूप नुकसान झाले. दलाईलामा येथे १९८३ मध्ये आले. त्यावेळी कालचक्राची पूजा झाली. मुख्य देवळात गोखंग म्हणजे दर्शनी हॉल. नंतर (वडाखच्या) येरीओच्या राजाने काश्मिरी कलाकारांना आणून त्यांच्याकडून हिंदू शैलीची पेंटींग करून घेतली. मध्यभागी बुद्धाची ४ मुळी असलेली मूर्ती आहे. त्यामागे लाकूड मातीच्या मूर्ती आहेत. बुद्धाची मूर्ती लाल रंगाची तर बाकीच्या २ देवता निळ्या व पांढऱ्या रंगाच्या आहेत. छताला खिडकी असल्याने वरून प्रकाश येतो. बाकी अंधकारमय आहे. कृत्रीम प्रकाशाने पेंटिंग्ज खराब होतात म्हणून तो प्रकाश नाही. फक्त काही मोठ्या पूजा-अर्चा असतील तरच हा मंडप वापरला जातो. दलाईलामाची येथेच पूजा केली गेली. टॅबू मोनॅस्टरीला 'हिमालयाचे अजंठा' म्हणूनही संबोधतात.

टॅबोहून धनकरला रवाना झालो. १ तासाच्या अंतरावर आहे. उंची १२७७५ फूट येथे स्पिती व पित नद्यांचा संगम आहे. येथे कड्यावरचा किल्ला आहे. ह्याला धनकर गोपा असेही म्हणतात हा १००० वर्षापूर्वीचा आहे व जगातील सर्वात जास्त धोकादायक १०० ठिकाणांमध्ये त्याचा समावेश आहे. आतील भित्तीचित्रे बंद असल्याने आम्हाला बघता आली नाहीत. हिमालय समुद्रातून वर आल्याने दगड ठिसूळ आहे. जागोजागी समुद्रातील अवशेष (fossil) सापडतात. आम्हाला वाटेत गुलाबी फुलांनी डवरलेली झुडुपे दिसली. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे एकाच झाडावर गुलाबी रंगाच्या अगदी गडपासून हलक्या रंगापर्यंत सर्व थटांची फुले एकाच झाडावर गुच्छासारखी शोभा देत होती. हे जंगली गुलाब (Webb's Rose) साधारण १५०० फुटावरून १३००० फूट उंचीवर आढळतात. पश्चिम हिमालयाबरोबर अफगाणिस्तान मध्येही त्यांचे ताटवे आहेत.

वाटेत अनेक ठिकाणी रस्त्याच्या मध्यावर दगड रचून ठेवले होते. त्याच्या डाव्या बाजूनेच जायचे. उजव्या वाजूने वळसा घालायचा नाही. ते अशुभ- अशी सर्व वाहनचालकांची समजूत! बाजूच्या डोंगरातील मातीचे सुळके ऋषीमुनी तप करत असल्यासारखे वाटत होते. इथे झाडी विरळ होती. स्पिती व्हॅली मध्ये पाऊस खूप कमी आहे. त्यामुळे ती वाळवंटी दरी आहे. उन्हाळ्यात बर्फ वितळूनच पाणी उपलब्ध होते. ओबडधोबड, राखाडी, पांढरे वेगवेगळ्या आकाराच्या दगडाचे डोंगर बघत आम्ही काझाला पोहोचलो.

### काझा १२४६७ फूट (३८०० मीटर)

प्रवेश केल्यावर आधी बाजारपेठ लागली नंतर पेट्रोल पंप लागला. हा Indian Oil चा पंप जगातील सर्वात जास्त उंचावरचा पेट्रोल पंप मानला जातो. येथे गाडीत पेट्रोल भरले. हॉटेल डोलेकला पोहोचले. खोल्या दुसऱ्या मजल्यावर उंच उंच पायऱ्या जिना अरुंद वर जाताना धाप लागायची. भरपूर पाणी प्या असा हॉटेल सेवकांनी सल्ला दिला. नाकोपासून काझा-रोहटांग खिंडीपर्यंत फक्त BSNL नेटवर्क चालते. तेही नीट नाही Internet तर नाहीच. Whatsapp हे बंद असल्याने आपोआप एकमेकांशी गप्पा मारण्यात आल्या ही फायद्याची बाब. हॉटेलच्या खोलीतून समोरच्या डोंगरावर बुद्धाचे मुख व नवोदय अशी अक्षरे दिसली. आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळा लांगझा, कोमिक व हिक्कीम ह्या आणखी उंचीवरील स्थळांकडे निघालो.

**लांगझा १४५०० फूट**

हे जगातील मोटार रस्त्यावरील सर्वात उंचीवर वसलेल्या गावापैकी आहे. येथे ३३ घरे असून त्यात १३७ लोक (सर्व बौद्ध) रहातात. मातीची वेगवेगळ्या आकाराची भांडी करणे हा येथील मुख्य व्यवसाय शेतात भात व बटाटे पिकवतात. येथील बुद्धाची सोनेरी मूर्ती १००० वर्षाची जुनीपुराणी आहे. सर्व घराबाहेर मातीची भांडी व जुने अवशेष (fessils) विकायला ठेवतात. त्यात समुद्रातील प्राणी व वनस्पती ह्यांचे अवशेष असतात. गाडीतून उतरल्यावर थंडगार वारे व कमी ऑक्सीजन ह्यामुळे हातपाय थरथरणे कुडकुडणे सुरू झाले. गरम कपडे घालूनच बाहेर पडलो. हा प्रदेश लाखो वर्षापूर्वी समुद्राखाली गाडला गेला होता. लांगझाहून आम्ही १० कि.मी. वरील कौमिकला गेलो. निसर्गरम्य परिसर रस्ते दुरूस्ती करणारी – पाठीवर मुलाला टाकून कामे करणाऱ्या बायकांच्या टोळ्या अशी दृष्ये दिसली. कौमिक काझापासून १८ कि.मी.वर आहे व जगातील सर्वात उंचीवरचे, १५०२७ फुटावरचे (४५८७ मीटर) गाव व मोटाररस्त्यावरील जगातील सर्वात उंच गाव असा किताब आहे. आम्ही कौमिकला पोहोचल्यावर आधी गावातील Highest Motovable Villageच्या बोर्डासमोर ग्रुप फोटो घेतला. येथे ट्रेकर्स ग्रुप पुष्कळ दिसले ते वंशाने परकीय होते. आम्ही तेथे स्पिती ऑरगॅनिक किचनमध्ये मस्तपैकी नेटला व मधयुक्त पॅनकेक खाल्ले. खास हिमालयातच मिळणारा सीबकथॉर्नटी हा चहा तेथील Wild berriesचे सिरप घातलेला गरमागरम वाफाळलेला मस्त चहा प्यावा. गावामध्ये टँग्युड मोनॅस्टरी आहे. स्त्रियांना आत प्रवेश नाही. आत खूप मोठा खजिना लपवलेला आहे. तो म्हणजे ड्रॅगनचे अंडे, युनिकॉर्नचे शिंग, मेंढीचा वरचा दात, टाससाचा सापळा आणि आद्य मानवाचे शेपूट आहे असे म्हणतात. आत जोरात पूजा अर्चा चालू असल्याने आम्ही तो बाहेरूनच पाहिला. तेथे बर्फाळ प्रदेशातील बिबट्या पेंढा भरून ठेवला आहे. महाकालीचा पुतळा आहे. आम्ही येथून पुढे निघालो हिक्कीमला.

हिक्कीमला हे कौमिक पासून ४ कि.मी. व काझापासून १६ कि.मी. वर आहे. हे समुद्रसपाटीपासून १४४३६ फूट उंचीवर आहे. येथे जगातले सर्वात उंचीवरचे पोस्ट ऑफीस आहे. गावात फक्त ८–१० च घरे आहेत. आम्ही थोडे खाली उतरून पोस्ट ऑफिसला गेलो. एक झोपडीवजा दगडी घर होते. तेथेच पोस्टमास्तर व त्याचा परिवार रहातो. बाहेर पादत्राणे काढून आम्ही आत गेलो. बाहेर तसा बोर्ड होता. आशिषने पटकन तेथे (उरलेली) पोस्टकार्डे १३ घेतली. त्यावर लावायला स्टँप नव्हते. पोस्ट मास्तरने सांगितले की तुम्ही ती पोष्ट करा. पत्त्यावरील व्यक्तीकडून स्टँपचे पैसे वसूल होतील पण पत्र नक्कीच जाईल. मी आईबाबाना व इतरानी त्यांच्या जवळच्यांना पत्रे खरडून पोस्ट केली. कौतुकाची व आश्चर्याची बाब म्हणजे आम्ही मुंबईला परतल्यावर ३–४ दिवसात सर्वांना पत्रे मिळाली व कोणाकडूनही स्टँपचे पैसे घेतले गेले नाहीत. एके ठिकाणी घराचे बांधकाम चालू होते. तेथे काम करणाऱ्या मजुरांनी आम्हाला fossils हवेत का विचारले. दगडावर समुद्रातील Seaanmore ह्या नामशेष झालेल्या प्राण्याचे ठसे होते. आम्ही २०० रु.ला ४ दगड घेतले. येथे वर चढताना धाप लागत होती. पण आम्ही आमच्याकडील कापराच्या पिशव्या हुंगून त्यावर मात केली. हिमालयात वास करणाऱ्या भगवान शंकराला कर्पुरगौरा म्हणतात. त्याचा कापराशी फक्त रंगाचा संबंध नसून वासाचाही आहे काय अशी मजेदार शंका आम्हाला आली. हिक्कीम ते काझा हा १६ कि.मी. चा रस्ता अंगावर शहारे येतील असा आहे. अत्यंत अरूंद रस्ता व बाजूला १००० फूट खोल दरी. परंतु आम्हाला स्पितीचे अविस्मरणीय नजारे बघावयास मिळाले.

हिक्कीमपासून के मोनॅस्टरी २७ कि.मी. आहे. ती १३५०४ फूट उंचीवर आहे. वाटेत जंगली गुलाबाचे ताटवे अनेक ठिकाणी दिसले. लांबूनच ही मोनॅस्टरी अतिशय सुंदर दिसत होती. ती स्पिती नदीच्या अगदी जवळ आहे. अकराव्या शतकात अतिशाचा विद्यार्थी ब्रॉमस्टॉन याने ती बांधली असावी, असा अंदाज आहे. मोंगोल लोकांनी सतराव्या शतकात आक्रमण केले. इ.स. १८४१ मध्ये डोगरा सैन्याने गुलामखान व रहीमखान यांच्या नेतृत्वाखाली



आक्रमण केले. १९७५ च्या भुकंपामध्ये ही मोनॅस्टरी उद्ध्वस्त झाली होती. आत शिरल्यावर बुद्धिष्टांच्या घंटा ओळीने एका लांब अरूंद वाटेवर एका बाजूला आहेत. मुख्य लामांसाठी २ खोल्या बांधल्या आहेत. तेथून वर चढायला अरूंद पायऱ्या आहेत. गोलगोल वर चढत गेल्यावर एका खोलीत एक उंच चषक काचेच्या पेटीत स्मारक म्हणून ठेवला आहे. चिनी लोकांनी तिबेटी लोकांवर अत्याचार करून त्यांना मारले. त्याचा बोर्ड तेथे लावलेला आहे. तेथे उदबत्त्या पेटवलेल्या आहेत. दुसऱ्या बोर्डावर की गोपा विषयीची माहिती आहे. १००० वर्षापूर्वीची ही मोनॅस्टरी अनेक आक्रमणे व नैसर्गिक आपत्तींना तोंड देत राहिली Archeological Survey of India ने तिची डागडुजी करून शाबूत ठेवली आहे. वरच्या मजल्यावर सुरेख भित्तीचित्रे आहेत. तेथे अतीप्राचीन Murals, पुस्तके व बुद्धाच्या मूर्तींचा खजिना आहे. एका खोलीत किन्नौरी भाषेत मंत्र लिहिलेले अशा अनेक कागदाच्या गुंडाळ्या काचेच्या कपाटात व्यवस्थित ठेवल्या आहेत. बुद्धाचा पुतळा आहे. तेथे एक प्राचीन ग्रंथ ठेवला आहे. त्याची पूजा होते. तेथील लामाने आम्हाला गरम वनस्पती चहा दिला. आमची आस्थेने विचारपूस केली. अलिकडेच हिक्कीमला त्यांच्या समुदायापैकी एका तरूणाला हृदयविकाराचा धक्का बसला. आम्ही हिक्कीमहून सुखरूप परत आले. ह्याचे समाधान वाटले. लामाला आम्ही घंटांविषयी विचारले त्याने सांगितले की तुम्ही एकादा मंत्र किंवा देवाचे नाव घेऊन त्या घंटा घड्याळाप्रमाणे (clockwise) फिरवल्या तर तुमची इच्छा फळद्रुप होते. आम्ही घंटा फिरवून आमच्या डेलेक हॉटेल वर परतलो व लवकर झोपलो, कारण उद्या सकाळी आम्हाला लवकर उठून ५ वा. काझा ते मनाली हा जगातला सर्वात धोक्याचा मार्ग (२०१ कि.मी) घ्यायचा होता. व दिवसा उजेडी मनालीला पोहोचायचे होते. ड्रायव्हर लकीने सांगितले की उन्हे पडल्यावर बर्फ वितळून रस्त्यावर पाणी साचून रस्ते बंद पडतात व अडकून पडायला होते म्हणून आम्ही पहाटे ५ वा. मनालीचा रस्ता पकडला. आता डोंगर पर्वत थोडे विरळ होऊ लागले. स्पिती नदी सोबतीला होती. ह्या प्रवासात वेळ खूप लागतो. थोडा भाग सोडला तर पूर्ण रस्ता खडकाळ व कच्चा आहे. वहाते झरे ओलांडून अरूंद रस्ता पार करावयाचा असतो. वाटेत लांगझाकडे जायचा रस्ता लागला. बातळ, कुंझुमपास, छत्रु, लेह मनाली हायवे (रोहटांग पास) मनाली असा हा मार्ग निसर्गाचे रौद्र शांत, निरामय, मनोहर अशा अनेक रूपांचा मिलाप आहे. रस्त्यावर कोठेही दिवे नाहीत. बातळ येथे चहाच्या टपरीत आम्ही थांबलो. येथे दोरजी बोधच्या चाचा-चाची शॉपमध्ये आम्ही नाश्ता केला. ह्या माणसाने बायकर्स, हायकर्स, प्रवासी ह्यांची अनेक वर्षे उत्तम सेवा व सोय केली आहे. बातल ला आम्ही कुंझुमपासवरून खाली उतरलो कुंझुमपास १५०६० फुटावर असून तो कुल्लू-मनाली व्हॅली लाहूल व्हॅली ह्यांना स्पिती व्हॅलीशी जोडतो. कुंझुमला एक कुंझुममातेचे देऊळ आहे. ह्या देवळात एका मऊ दगडावर तुम्ही एक नाणे ठेवायचे. ते चिकटले तर तुम्ही चांगले- पडले तर तुम्ही वाईट अशी परीक्षा आहे. आम्ही सर्वांनी परीक्षा दिली.

बातळपासून पुढील प्रवास खूप खडतर होता. समोरून सतत मेंढ्यांचे मोठमोठे कळप येत होते. त्यामुळे रस्ता पूर्ण बंद होत होता. एके ठिकाणी भार वाहणाऱ्या घोड्याच्या धक्क्याने आमच्या गाडीची मागील गाड्या दिसणारी काच निघून आली. नंतर आला पगला नाला. ह्या नावाची (कु)ख्याती अशी आहे की रस्त्यावर मोठमोठे गोल दगड आहेत. हिमनग वितळून पाणी वाढले तर २-२ दिवस हा नाला पार करता येत नाही. आमच्या सुदैवाने पाणी वाढले नव्हते. पण पुढील दोन गाड्या थांबल्या होत्या. आम्ही खाली उतरलो. दोन्ही गाड्यांच्या चालकांनी आमचा ड्रायव्हर लकीला गाडी Left-Right करण्याचे मार्गदर्शन केले. पेट्रोल टँक फुटू नये म्हणून खूप काळजी घ्यावी लागते. असो. नदी अगदी बाजूने वाहत होती. आमच्या बाजूला मोठमोठे गोल रंगीबेरंगी दगड निसर्गाने उधळल्यासारखे होते. आम्ही ११च्या सुमारास छोटा धाराला पोहोचलो. हे १३४५० फुट उंचीवर आहे. १वा आम्ही लाहुळ व्हॅलीचा बोर्ड लागला तेथे फोटो घेतले. येथे एक रस्ता कोकसार, कीलॉग मार्गे लेहकडे जातो तर डावीकडे रोहटांग-मनाली कडे. आम्ही आता धोक्याचा रस्ता पार केल्याने मनावरचे दडपण उतरले. रोहटांगला आम्ही दुपारी २वा पोहोचलो. येथून मनाली ५१ कि.मी. आहे. रोहटांग १३०५० फूट उंचीवर पूर्व पीर पंजाब पर्वतरांगात आहे. स्पिती व्हॅली बुद्ध संस्कृती आहे तर कुलु व्हॅली हिंदु संस्कृती आहे. लाहोलव्हॅलीत बुद्ध संस्कृती आहे. रोहटांग खालून बियास नदी वाहते. रोहटांग येथे बोगद्याचे काम चालू आहे. २०१० मध्ये ८.५ कि.मी. लांबीच्या बोगद्याचे काम चालू झाले. १९८७ मध्ये आम्ही मनालीला आलो होतो. त्यावेळी ह्या रस्त्यावर आम्हाला मनालीपासून जेमतेम २० कि.मी. पर्यंतच येता आले. पुढे रस्ता बंद होता.

आम्ही एका धाब्यात जेवण घेतले. वाहनांची खूप गर्दी होती. उंच उंच पाईन वृक्षांची दाटी व हिरवेगार डोंगर बघून प्रसन्नता वाटली. आम्हाला वाटेत सनी देओल मोठ्या गाडीतून रोहटांगकडे जाताना दिसला. आम्ही १९८७ मध्ये उतरलो होतो, त्या देवलोक हॉटेलजवळ हॉटेल ग्लेसियर रिझार्टला उतरलो व आमचा स्पिती व्हॅली दौरा सुफळ संपूर्ण झाला.

***(लेखिका सौ. अनिता मुरूडकर ही म.प्र.चे भूतपूर्व ज्येष्ठ कार्यवाह श्री. मोहनराव मराठे यांची सुकन्या आहे. श्री. मोहनराव मराठे यांच्या सक्रीय पुढाकारामुळे उडिपी, (कार्कळ) दुर्ग येथील २००९ साली भरलेले नववे संमेलन यशस्वी झाले होते.)*** ♦

# श्रीदिनकरस्वामी तिसगांवकर

## (श्रीसमर्थरामदासांचे शिष्य)

• डॉ. सौ. सुमेधा प्र.मराठे, (पृ. १२०), वडाळा

दूरध्वनी – ०२२–२४१५०८८९

**श्रीदिनकरस्वामी तिसगांवकर (शके १५५०–१६१९)**

श्रीसमर्थ रामदासांचे मठ म्हणजे त्यावेळची विद्यापीठेच होत. अशा विद्यापीठांपैकी तिसगावच्या पीठाचे अधिपति श्रीदिनकर रामदास हे एक होते. श्री. रामदासस्वामींनी त्यांचे नाव दिवाकर ठेवले होते असे दिनकरपुत्र रामचंद्र म्हणतात. दिनकरांच्या मातेचे नाव द्वारका होते. त्यांच्या घराण्याचे मूळ उपनाव मुळे, परंतु ज्योतिबाच्या व्यासंगामुळे पाठक हे उपनाम पडले. जेजुरीचा खंडेराय आणि मातापुरची देवी ही त्यांची कुलदैवते होय.

श्रीदिनकरस्वामींची जन्मतिथी नक्की सांगता येत नाही. श्री शंकर श्रीकृष्ण देव यांनी ती शके १५५० च्या सुमारास ठरविली आहे. दिनकरांना श्रीसमर्थांचा अनुग्रह शके १५७६ मध्ये झाला. त्यावेळी त्यांचे वय २५–२६ वर्षांचे होते, असा अंदाजही श्रीदेव व्यक्त करतात.

लहानपणापासून दिनकरांचा ओढा परोपकाराकडे विशेष असे. कोणताही कष्टी प्राणी, दुःखी जीव पाहिला म्हणजे ते तळमळत असत. आपल्या दाराशी आलेला याचक ते कधीही रिक्तहस्ताने पाठवीत नसत. जो जे मागील ते त्यांस देत. या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांच्या मातोश्रींना चिंता वाटे! त्यावर दिनकरस्वामी आईची समजूत घालताना म्हणत, 'सर्वच देवाचे आहे आणि देव सर्वाभूती आहे, तेव्हा ज्यांचे त्यास दिले यांत वावगे काय झाले?'

जन्माला आलो आहे तर परमार्थ करून जन्म सार्थकी लावावा देहाची सफलता करावी असा दृढ संकल्प करून दिनकरस्वामींनी शके १५७४ ला आपले मूळ गाव भिंगार सोडून परमार्थाला योग्य असे स्थळ जे वृद्धेश्वर त्या ठिकाणी गेले. भिंगारच्या ईशान्येस सुमारे १४ कोसावर डोंगरात हे पुरातन पवित्र स्थान आहे. येथे त्यांनी शके १५७५ मध्ये पुरश्चरणाला प्रारंभ केला. याठिकाणी त्यांना दृष्टान्त झाला. श्रीरामाने आणि रामदासांनी त्यांना दर्शन दिले. त्यानंतर शके १५७६ च्या फाल्गुन शुद्ध १५ला श्रीसमर्थांचे आगमन वृद्धेश्वराकडे झाले! दिनकरस्वामींना स्वप्नात दर्शन दिलेल्या मूर्तीची आठवण झाली. त्यांनी रामदासांचे पाय घट्ट धरले. तेव्हा श्रीसमर्थांनी आपला सव्यकर दिनकरांच्या मस्तकी ठेवला त्यावेळी दिनकरस्वामींनी ब्रह्मानंदाचा अनुभव घेतला, त्यांना धन्यता वाटली.

श्रीसमर्थ रामदासांनी दिनकरस्वामींना नित्यपूजेसाठी श्रीरामाची मूर्ती दिली. दिनकरांनी तिची स्थापना वृद्धेश्वरापासून तीन कोस असलेल्या तिसगांव येथे केली आणि श्रीरामाची उपासना परंपरेने पुढे चालविली. तिसगाव व मठीं त्यांनी श्रीरामनवमीचा उत्सव सुद्धा सुरू केला.

दिनकरस्वामींनी 'स्वानुभवदिनकर' हा ग्रंथ शके १६१६ चैत्र शुद्धनवमी इंदुवासरे तिसगांव येथे लिहिला. दिनकरांची अभंग, श्लोक, पदे, सवाया, धनाक्षरी इ. कविता उपलब्ध आहे. त्यांचा 'स्वानुभव दिनकर' हा ग्रंथ प्रासादिक असून दासबोधाची छाप त्याच्यावर पडलेली दिसून येते. दिनकरांच्या मुखातून जे स्वसुखोद्गार निघाले ते या ग्रंथात ग्रथित झालेले आहेत. श्रीगुरूभक्ति कशी करावी, सद्गुरुकृपा कशी संपादावी याचा उत्तम बोध वाचणाऱ्यास होतो. विवेक, वैराग्य, सत्कर्म, भक्ति, ज्ञान, विज्ञान, देहचतुष्ट्यनिरास, महावाक्यविवरण, माया, ब्रह्म, योग, पुरश्चरण, रामोपासना इ. शेकडो विषयांचे स्वानुभाविक विवेचन या ग्रंथात आलेले आहे.

'स्वानुभव दिनकर' या ग्रंथात नवनाथ, सिद्ध, योगी यांच्याबरोबर श्रीदत्तांचाही समावेश दिनकरस्वामींनी केलेला दिसून येतो. त्यांच्या या ग्रंथात श्रीदत्तात्रेयाचे उल्लेख पुढीलप्रमाणे येतात.

१) दत्त गोरक्ष हनुमंत। आदिनाथ मीन गैनी अवधूत।
चोऱ्हयासी सिद्ध आणि योगी समस्त। नवही नाथ।।७५।।

*कलाप१, किरण १, पृ.६*

दत्तगीता। गोरक्षगीता। शिवस्कंद गणेशगीता।
गर्भगीता लक्ष्मणगीता। हनुमंतगीता यथोक्त।।८९।।

*कलप १, किरण १, पृ.७*

दत्त दुर्वास्तादि वसिष्ठ हनुमंत। कपिल मत्स्येंद्रादि गोरक्ष अवधूत।
नवनाथ चौऱ्यासी सिद्ध युक्त। योगसिद्धि थोरावले।।३२।।

*कलाप ९, किरण २, पृ. २३५*

संत महंत मुनेश्वर। सिद्ध साधु योगेश्वर।
दत्तगोरक्ष दिगंबर। जये स्वरूपीं निमग्न।।६।।

*कलप १२, किरण ५, श्लोक ६ पृ. ३६२*

शके १६१६ ते १६१९च्या दरम्यान दिनकरस्वामींनी आपले अवतारकार्य समाप्त केले. दिनकरस्वामींनी केलेले, श्री दत्तात्रेयासंबंधीचे हे उल्लेख पाहता, दिनकर स्वामी, श्रीदत्तात्रेयांना नाथ सम्प्रदा यातील ८४ सिद्धांपैकी एक अवधूत मानतांना दिसतात.

♦

# खिडकी

• सौ. साधना सु. मराठे, (पृ. ५७), नागांव                भ्रमणध्वनी – ९७६७६५३१३१

'आठशे खिडक्या नऊशे दार, कोणा वाटेना गेली ती नार' ह्या लोकगीताच्या ओळी ऐकतांना खूपच मजा वाटते. पण मंडळी सर्व प्रथम मनाची खिडकी उघडी ठेवली तर ह्या गाण्याची मजा लुटता येईल. हे जग किती सुंदर आहे प्रत्यंतर येईल. जगात असंख्य चांगल्या वाईट गोष्टी  घडतच असतात. पण आपण त्या किती स्वीकारायच्या आणि किती दुर्लक्षित करायच्या हे आपल्या मनावर अवंलबून असते. परंतु मनाची खिडकीच बंद केलीत, तर आपले जगणे निरस आणि अर्थहीन होईल. आणि म्हणूनच मनाच्या खिडकीतून बाहेरचे जग उघड्या डोळ्यांनी पहा.

असो. घर म्हटलं की खिडकी आलीच. मग ते घर मोठे असो की हवेली असो किंवा छोटेसे कौलारू असो. अगदी झोपडीतसुद्धा लहानशी खिडकीही असतेच. ज्या घरात आपण राहतो तिथे वायुविजन होणं सर्वात महत्त्वाचं असत. हल्ली शहरात काय किंवा खेडेगावांत काय सिंमेट क्रॉंक्रीटच्या ब्लॉकना तर मोठ्या खिडक्याची खूप आवश्यकता असते. घरे सिमेंटची असल्यामुळे घरात थंडाव्यापेक्षा उष्णतेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे उत्तम प्रकारे वायुविजन होणे ह्यावर आपले आरोग्य अवलंबून असते. खिडक्या ह्या घरांचा अविभाज्य असा भाग असतो.

इतकंच कशाला आपण ज्या ज्या वाहनातून प्रवास करतो. त्या सर्व वाहानांना खिडक्या असण आवश्यकच असत. प्रवास करताना बाहेरचा निसर्गाचा मनमुराद आनंद उपभोगू शकतो. मग ती आकाशातील सैर असो किंवा बोटीतून समुद्र नद्या ह्यातून केलेली सफर असो. रस्त्यावरून जात असणाऱ्या वाहनांतून खड्डे किती आहे हे खिडकीतून पाहू शकतो. फारच रस्त्यावरील खड्डे हाही आपल्या प्रवासात असताना जगण्यामरण्याचा अविभाज्य भाग आहे हे आपण विसरून चालणार नाही.

खिडकीतून आपण आणखीही बरंच काही पाहू शकतो. पौणिमेच्या चंद्राची कोर पाहू शकतो. खिडकी मोठी असेल गरमागरम चहा-कॉफीचे घुटके घेत पावसाची विविध रूपे पाहू शकतो. घराजवळून रस्त्यावरून धावणारी वाहने. विविध रंगाढंगाची माणसे पाहू शकतो. खिडकीच्या दारावर चोचीने टकटक वैविधपूर्ण आवाज काढून आपले मनोरंजन करणारे इवले इवलेसे छोटे पक्षी पाहू शकतो.

खिडकीशी उभं राहून आपल्या छोट्या बाळाला काऊ चिऊचा घास भरवतो. तरूणाई एकमेकांच्या प्रेमात असतील असतील तर तो किंवा ती कोणाला कळणार नाही दिसणार नाही, अशा पद्धतीने फ्लाईंग किस किंवा छोटासा रूमाल हलवून निरोप घेता येतो. अहो एवढेच कशाला आपले संत तुलसीदास ह्यांना आपला पत्नीचा विरह सहन न झाल्यामुळे खिडकीचा उपयोग लिलया करता येतो, हे दाखवून दिले. मग त्याचं आणि तिचं तर विचारूच नका. तसेच चौर्यकर्म करणाऱ्या चोरांना खिडकीचे गज वाकवून ते आत सहज प्रवेश करण्यात वाक्बगार असतात. पूर्वीतर म्हणे मोठाला चौसोपी वाड्यात घरातील स्त्रिया आपल्या नूतन जावयाला त्या वाड्यात छोटीशी खिडकी हमखास ठेवलेली असे तिच्यातून पाहात. आहे की नाही गंमत.

खिडकीच्या जवळ जर एखाद्या सुंगधी फुलाची वेल हळूच डोकावत असेल तर त्या रातराणी, मोगरा, जाई जुई, गुलाब ह्यांच्या सुंगधाने घर प्रसन्न तर रहातेच. पण रातराणी गोड दरवळ तुम्हाला भरभरून सुगंधाची उधळण करते आणि त्या सुंगधाचा भरभरून गोड वास जेव्हा दीर्घ श्वासावाटे मनसोक्त अंतरंगात साठवता येतो. आनंद खरंच अपूर्वाईचा असतो. एक खिडकी अशीही असते की ती टिंगलटवाळी करणारी थोडीशी उनाड खिडकी. त्या खिडकीशी उभे राहून आपण कोणाला दिसणार नाही अशा पद्धतीने शेरेबाजी करणारे महाभागही असतात, बरं का? रस्त्यावरून गल्लीबोळांतून विविध प्रकारचे निघणारे मोर्चे जिंदाबाद मुर्दाबाद ओरडत निघणारे कार्यकर्ते ह्याची पण मजा अशा खिडकीतून बघू शकतो. त्या निघणाऱ्या मोर्चावर कॉमेंट्स करणे हा आपला जन्मसिद्ध हक्कच असतो. अशा ह्या खिडकीचे विविध उपयोग बघता बघता एक जीवघेणी खिडकीला एक काळी बाजू असते. त्या वस्तीतल्या साऱ्याच खिडक्या बदनाम तर असतातच पण टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी रात्र पसरताच चेहऱ्यावर रंगरंगोटी करून अश्लिल हावभाव करत गिऱ्हाईकास आकर्षित करण्यासाठी त्या खिडकीत बसणाऱ्या अभागी स्त्रिया पाहिल्या की काळीज विदीर्ण होतं. अगदी लहानवयातील कोवळ्या मुलीपासून ५०शी पार केलेल्या. त्यांच्या कोमल तारूण्याचा धगधगता होमकुंड वासनेच्या लवलवत्या ज्वालांनी त्यांना बेचिराख करत असतो ते दृश्य पहाणं म्हणजे समस्त स्त्री जातीचा अपमान वाटतो. त्या खिडकीत ही निश्चितच वेदना होत असतील, दुःख होत असेल. पण समाजाची आत्यंतिक गरज म्हणून त्याचा डांगोरा पिटला जातो. जगाच्या अंतापर्यंत ही खिडकी उघडीच राहणार त्या अभागी जीवांना आशेच्या प्रकाशाची वाट माहितच नाही. हे त्यांचं दुर्देव आहे. ♦

Schwieger Mutter? Neine Mutter

# वरील शब्द जर्मन आहेत. सासूबाई? नाही आई

• सौ. मीना सदानंद मराठे, (पृ.४१४), बांद्रा दूरध्वनी - ०२२ २६४५९५३०

मला जर्मन भाषा कोणामुळे अवगत झाली? अर्थात माझ्या सासूबाईमुळे त्यांची मैत्रिण जर्मनभाषेचे क्लास घेत असे. सकाळी १२ पर्यंत सगळी कामे आटोपली की दूपारचा वेळ मोकळा असे. त्यामुळे आठवड्यातून २ दिवस कुमुदताई पाटकरांकडे जाऊन जर्मन शीक, असा सल्ला सासूबाईंनी मला दिला. त्या प्रमाणे मी एक वर्षभर कुमुदताईकडून प्राथमिक जर्मन भाषा शिकले. त्यानंतर कुमुद ताईच्या मार्गदर्शनाने मी पुढील वर्षी ''Max Muller'' संस्थेत प्रवेश घेतला. ही संस्था चर्चगेटला आहे. सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत जर्मनचा अभ्यासवर्ग चाले. पहिल्या दिवशी घरचे सर्व आटोपून मी वेळेवर पोहोचेन की नाही असे मनावर दडपण होते. पण सासूबाईनी सांगीतले, ''तू स्वयंपाकाची काळजी करू नकोस. मी आहे ना!'' हे ऐकून मनावरचे दडपण दूर झाले. मी आनंदाने क्लासला गेले.

पहिल्या दिवशीचा क्लास आटोपून मी बरोबर २.३० वाजता २१४ क्रमांकांच्या बसमधून घराच्या दारात उतरले. सहज वर पाहिले तर सासूबाई माझी वाट पाहत गॅलरीत उभ्या होत्या. मी वर पोहोचले. सासूबाई म्हणाल्या, ''तू कपडे बदलून ये चहा तयार आहे.'' माझ्या डोळ्यात पाणी आले. माझ्यासाठी हा अनुभव अनन्यसाधारण होता. त्यानंतर ३ महिने माझा क्लास चालू होता. न चुकता सासूबाई माझी वाट पाहत उभ्या असत. कायम हसत मुखाने माझे स्वागत, गप्पा गोष्टी करत चहा पिणे. असे जणू वेळापत्रकच जमून गेले होते.

माझ्या सासूबाई खूप हौशी होत्या. शांत, सोज्वळ, प्रेमळमुर्ति. कधी कुणाचा राग, द्वेष, गर्व हव्यास हे शब्द त्यांच्या शब्दकोषातच नव्हते. साधी रहाणी व उच्च विचारसरणी अशा तत्वाने त्या वागत असत.

सासूबाईना वाचनाची खूप आवड होती. कायम कोणते तरी पुस्तक त्यांच्या हातात असे. त्या पाककलेतही निपुण होत्या पुरणपोळी, उकडीचे मोदक, लाडू, खीर, अंब्याचा शिरा, विविध प्रकारच्या वड्या, करंज्या हे सर्व पदार्थ मी त्यांच्याकडूनच शिकले. प्रत्येक सणाच्या आदल्या दिवशी त्या स्वतः दादरला जाऊन भाज्या आणत, झेंडूची फुले आणत, विड्याची पाने आणत. पहाटे पहाटे दारावर लावण्याचे तोरण तयार ठेवत. नंतर सर्व सुग्रास स्वयंपाक, मग सर्वांसाठी गोविंद विडा त्या हौशीने करत असत. हे सर्व त्या प्रेमाने व हौशीने करत असत.

माझ्या लग्नातंरचे प्रत्येक सण म्हणजे मंगळागौर, दसरा, दिवाळसण माझा वाढदिवस, माझ्या लग्नाचा वर्षसण हे दोन्ही घरी दणक्यात साजरे केले गेले. एक माझ्या माहेरी चेंबूरला व दुसरे माझ्यासासरी बांद्रयास.

सासूबाईंना पर्यटनास जाण्याची पण आवड होती. त्याचा काटकपणा, सहनशक्ती व उत्साह पाहून मी चकित होत असे. त्या पुणे ते पंढरपूर वारीबरोबर पायी गेल्या, नर्मदा परिक्रमा, अमरनाथ, बद्रिकेदारची यात्रा पायी करून आल्या. तसेच काश्मिर ते कन्याकुमारी, राजस्थान ते जग्गनाथ पुरी पर्यंतच्या सर्व ठिकाणी भारत दर्शन यात्रा कंपनी बरोबर जाऊन आल्या, हया सर्व प्रवासामध्ये त्यांनी अनेक मैत्रिणीपण जोडल्या होत्या. त्यांच्या हसऱ्या, बोलक्या व्यक्तीमत्त्वामुळे त्यांनी खूप माणसे जोडली. संसारशास्त्र वर्गचालविणाऱ्या मीनाक्षीताई शिवेश्वरकर, ''रूचिरा'' पाक शास्त्राचे पुस्तकाच्या लेखिका कमलाताई ओगले, भाऊबीज फंड गोळा करून हिगंणे येथील महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या संस्थेसाठी काम करणाऱ्या श्रीमती. शांताबाई परांजपे, सासुबाईंच्या परिचयाच्या होत्या.

माझ्या सासुबाईना राजकीय घडामोडी बद्दल देखील खूप जागरूकता होती. सन १९६८-६९ मध्ये त्या कच्छकराराच्या विरोधी आंदोलनात देखील सामील झाल्या होत्या. त्यासाठी त्यांना १ महिना तुरूंगवासही सोसावा लागला.

त्या वांद्रयाच्या ''कलाविकास'' महिला मंडळाच्या सभासद होत्या. तसेच वाचनाची आवड असल्याने ''नॅशनल लायब्ररी'' च्या आजीव सभासद होत्या. आठवड्यातून एकदा त्या लायब्ररीत जाऊन पुस्तके व मासिके आणीत असत. ''दक्षता'' हे त्यांचे आवडते मासिक. त्यातील चित्तथरारक गोष्टी त्या मला नेहमी सांगत असत. पार्ला येथील ''स्त्रीसखी'' मंडळाच्या देखील त्या सभासद होत्या. मुंबई ग्राहक पंचायतीच्या तर त्या, सक्रीय कार्यकर्त्या होत्या. जवळ जवळ २० वर्षे त्यांनी स्वतःच्या घरी ग्राहक संघ चालविला. मालाची ऑर्डर देणे, बिल भरणे, सामानाचे वाटप करणे ह्या सर्व गोष्टी त्यांना व्यवस्थितपणे पार पाडल्या. त्यांना भजनाची देखील आवड होती. दर मंगळवारी त्या दादरच्या भजनी मंडळात जात. आमच्या घरी ५ दिवसाचा गणपती असतो. त्यामुळे गणपतीच्या ५ दिवसात कधी तरी एक दिवस आमच्या घरी त्या मंडळाच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित

करीत असत. आलेल्या मंडळीसाठी खिचडी, कॉफी, लाडू असा फराळाचा बेतही त्या हौशीने ठेवत असत. ''अतिथी देवो भव'' हे तर त्यांचे ब्रीद वाक्य होते. त्यांची हौस, पाहुणचार व कल्पकता खरोखरीच वाखाणण्यासारखी होती.

माझ्या डोहाळे जेवणाचा कार्यक्रम तर सर्वांना कायम लक्षात राहील असा झाला. सासूबाईनी सकाळच्या जेवणात पंचपक्वान्न केली होती. तो फेब्रूवारी महिना होता. दारात त्यांनीच लावलेले आंब्याचे झाड कैऱ्यांनी बहरले होते. माझ्या मावस दिराच्या मदतीने त्यांनी कैऱ्यांनी लगडलेली एक मोठी फांदी तोडून आणली. दिवाणखाण्यात आम्रवृक्षाचा देखावा सजविला. त्या आम्रवृक्षाखाली माझी ओटी भरून औक्षण करून कौतुक सोहळा साजरा केला. दारच्या झाडाच्या भरपूर कैऱ्या निघाल्या होत्या. समारंभास उपस्थित असलेल्या प्रत्येकीला त्यांनी उपहारानंतर भरपूर कैऱ्या दिल्या. नातेवाईक खूप खूष झाले. ही एक अनोखी व आवडीची भेट होती.

मी बाळंतपणासाठी चेंबूरला माहेरी गेले. १६ मे रोजी दुपारी १.२५ अनुजाचा जन्म झाला. बातमी कळल्याबरोबर ताबडतोब माझ्या सासरची सर्व मंडळी मला व बाळाला भेटण्यास दवाखान्यात पोहोचली. सर्वांना खूप आनंद झाला होता. सासूबाई माझ्यासाठी खास बदामाच्या वड्या, आळीवाचे लाडू घेऊन आल्या. जवळजवळ २ महिने मी चेंबूरला होते. मला भेटायला येताना सासूबाई प्रत्येकी वेळी डिंकाचे लाडू, आल्याच्या वड्या, खसखसीची खीर, खारकेची खीर असे पौष्टीक पदार्थ प्रेमाने आणत असत. माझ्यासाठी त्या इतक्या प्रेमाने सर्व करीत असत की मला आजही त्यांच्या आठवणीने गहीवरून येते.

अनुजाला वाढविताना मी वेळोवेळी त्यांच्या सल्ला घेत असे. तिला कधी बरे नसेल तर त्या मला धीर देत असत. औषध कोणते दे, काय कर, ते सांगत, प्रसंगी माझ्या सोबत जाग्रण देखील करत.

आप्पा आजारी असताना मला एक दिड महिना आप्पांची सेवा करण्यास चेंबूरला रहावे लागले. पण अनुजाची शाळा सुरू झाली होती. सासुबाईनी अनुजाला नीट सांभाळले. तिचे खाणे, पिणे, शाळेत जाणे याची जबाबदारी त्यांनी घेतली. त्यामुळेच मी अप्पांची सेवा करण्यासाठी चेंबूरला राहू शकले. माझ्या सासरच्या सर्वांच्या सहकार्याने ते सहज शक्य झाले. माझ्या सासरी मला देवमाणसे लाभली, म्हणुन मी गणपती बाप्पाचे आभार मानते.

माझ्या सासरी म्हणजे मराठ्यांच्या घरी कोणताही सभारंभ म्हणजे एक आनंद सोहोळा असे. आम्ही सर्वांनी मिळून सासूबाईची एकसष्टी, तसेच मामा व सासूबाईच्या लग्नाचा ५० वा वाढदिवस खूप आनंदात व थाटात साजरा केला. सर्व जण म्हणजे प्रभाताई, शरदराव मालविका, मुकुंद, लताताई, जयंतराव, विक्रम, आदिती, सतीशभावजी, शोभनावहिनी, अभिजीत, सविता, किशोर भावजी, नूतन, अश्विनी, सदानंद, अनुजा, मीना यांच्या सोबत उत्सवमुर्ती मामा व सासूबाई हा आमच्या कुटुंबाचा फोटो पहिला की आजही मन आनंदाने भरून येते.

सर्वकाही, आनंदात दैनंदिन जीवन चालू होते. अचानक सासूबाईना थंडीवाजून ताप आला. त्यांच्या पोटात दुखू लागले. डॉ. पै ची Appointment घेऊन त्यांना सुश्रुषा हॉस्पिटल (दादर) येथे दाखल केले. दुखण्याची तीव्रता इतकी होती की त्या रात्री सासूबाई कोमात गेल्या. ही घटना २६ जानेवारी १९९१ आम्ही सर्वजण घाबरून गेलो. डॉक्टरांनी ७२ तासांचा कालावधी सांगितला होता. मी मनोमन गणपती बाप्पाचा धावा सुरु केला. घरातील सर्वजण चिंतातूर होते. प्रत्येक जण त्यांना लवकर बरे वाटू दे, अशी प्रार्थना करीत होते. देवाने आम्हासर्वांची प्रार्थना ऐकली ३१ जानेवारी १९९१ रोजी सकाळी सासूबाई शुध्दीवर आल्या. डोळे उघडले. सर्वांकडे पाहून हसल्या. अगदी Normal आम्हा सर्वांना खूपच आनंद झाला. देवाचे आभार मानले. सासूबाईना उदंड आयुष्य मिळू दे अशी गणपती बाप्पाकडे प्रार्थना केली.

परत सगळे पूर्ववत आयुष्य सुरू झाले. त्यानंतरची ३ वर्षे सुरळीत गेली. सासूबाईच्या मनात ''मानससरोवरास'' भेट देण्याची इच्छा होती. पण तेथे जाण्यास वयाचे बंधन होते. त्यामुळे त्यांची ती इच्छा पूर्ण झाली नाही. डॉक्टरांनी सांगितल्या प्रमाणे सर्व औषधपाणी व आहाराचे पथ्य त्या व्यवस्थित पाळत होत्या. त्या खरोखरीच एक स्वयंसिध्दा होत्या. इतके सगळे पथ्य पाळून देखील परत दुखण्याने त्यांना ग्रासले. परत पोटात दुखू लागले. सासूबाईची सहनशक्ती जबरदस्त होती. इतका त्रास त्यांना होत असूनही ओरडाआरडा नाही की चिडचिड नाही. परत त्यांना सुश्रुषा हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले. तो दिवस होता २५ नोव्हेंबर १९९४. मात्र ह्यावेळी दैवाने साथ दिली नाही. दवाखान्यातच उपचार घेत असता २६ नोव्हेंबर रोजी त्यानी अखेरचा श्वास घेतला. इतका त्रास सहन करून देखील त्यांचा चेहेरा तसाच शांत व समाधानी दिसत होता.

त्यांचे अंत्यदर्शन घेताना मला अश्रू अनावर झाले होते. मला सासरी आल्यावर खऱ्याअर्थाने आई लाभली होती. आज मी माझ्या आईला पारखी झाले. त्यांची उणीव कधीच भरून येणार नाही.

पण त्यांच्या आठवणीवर पुढील वाटचाल करीत आहे. मी त्यांची आजन्म ऋणी आहे व ऋणी राहीन. तुम्ही माझ्यासाठी कायमच ''मातृदेवोभव।'' आहात.

हीच माझी श्रध्दांजली!

♦

# अधिकस्य फलम् अधिक

• श्री. नंदकुमार मराठे, (पृ.२१७), कोल्हापूर भ्रमणध्वनी – ९९६०६३६०४०

आपले सण, उत्सव, व्रते आणि उपासना वगैरे चांद्रमासाप्रमाणे म्हणजे चंद्राच्या गतीवरून ठरविले आहेत. ठराविक महिन्यात किंवा ठराविक ऋतूतच यावेत म्हणून दोन्ही प्रकारच्या काळ गणनेत मेळ घालण्यासाठी पंचांगकर्त्यांनी दर तीन वर्षांनी चांद्रमासाचा एक महिना अधिक म्हणून ठरविला आहे.

या अधिक मासाला 'मलमास' असे नामकरण झाले. या महिन्यात मंगल कार्याऐवजी पुण्यकार्य करण्यासाठी प्राचीन काळी भगवान श्रीकृष्णांनी पांडवांना सांगितलेल्या कथेत परमश्रेष्ठ श्रीकृष्णाकडे विष्णूंनी मलमासाची व्यथा सांगून श्रीकृष्णांनी स्वतःचे नांव पुरुषोत्तम मास असे देण्याचे पौराणिक उल्लेख आढळतात.दर तीन वर्षांनी अधिक महिना येतो म्हणजे त्या वर्षात १२ ऐवजी १३ वा महिना येतो. तो एक प्रकारचा धोंड म्हणून त्याला **'धोंड्याचा महिना'** असेही संबोधतात.अधिकमासाला 'मलमास' किंवा मलिचल्लू असेही संबोधतात.

मराठी भारत वर्षात चैत्र महिन्यापासून अश्विन महिन्यापर्यंत एकदा तर कधीकधी फाल्गुन हा महिनाही अधिक मास म्हणून येतो.

दर महिन्यात सूर्य एकेका राशीतून संक्रमण करतो. परंतू ज्या महिन्यात सूर्य कोणत्याही राशीतून संक्रमण करीत नाही,तो महिना 'मलमास' म्हणजेच 'अधिक मास' म्हणून धरतात. दर अठरा वर्षांनी तोच महिना पुन्हा अधिक महिना म्हणून येतो. चांद्रवर्ष व सौरवर्ष यांचा मेळ घालण्यासाठी सरासरी बत्तीस किंवा तेहतीस चांद्रमासानंतर चांद्रवर्षात जो एक अधिक महिना धरावा लागतो.

कार्तिक, मार्गशिर्ष, पौष, माघ हे कधी क्षयमास होतात. पंचांगात ते महिने नसतात, अशा वर्षात अधिक मास दोन वेळा येतो. क्षयमासापूर्वीचा अधिक मास पुण्यकर्त्यांना वर्ज्य. त्यानंतर येणारा दुसरा अधिक मास 'पुरुषोत्तमास' म्हणून शास्त्रकर्ते मानतात. अधिक मासात सूर्य संक्रात नसते. अशावेळी चंद्र – सूर्याच्या गतीत फरक पडतो. म्हणून वातावरणात ग्रहण काळाप्रमाणे विशेष असा बदल संभवतो. या काळाप्रमाणे भगवान पुरुषोत्तम श्रीकृष्णाचे पूजन माहात्म्य सांगितले आहे.

प्राचीनकाळी निमिष नावाच्या अरण्यात तपोभूमीवर अनेक ऋषीमुनी यज्ञ कार्यासाठी एकत्र येत. त्यासाठी व्यास महर्षींचे शिष्य 'सूत' मोठे पुराणिक होते. त्यांना शौनक नावाच्या ऋषींनी या व्रत उद्यापनाविषयी विचारलेल्या विविध शंका प्रश्नांमध्ये सुतांनी अधिक माहात्म्य सांगितल्याचे संदर्भ आढळतात.पद्मपुराण, देवी भागवत यामध्ये अधिक मासाचे उल्लेख आढळतात.

चांद्रमासाचे वर्षाचे दिवस आणि सौरवर्षाचे दिवस यांचा मेळ घालण्यासाठी दर तीन वर्षांनी म्हणजे सुमारे साडेबत्तीस महिन्यांनी हा कालावधीत ३२ महिने १६ दिवस ४ घटिकांचा एक महिना जास्त धरतो. त्याला 'अधिक मास' म्हणतात.

'दुष्काळात १३ वा महिना' अशी म्हण या प्रवृत्तीतूनच तयार झाली आहे. मार्गशिर्ष, पौष, माघ, फाल्गुन यांना जोडून अधिक महिना सहसा येत नाही. सर्वसाधारणपणे १२ वर्षांनी चैत्र, ज्येष्ठ, श्रावण, महिन्यात अधिक मास येतो. १८ वर्षांनी 'अधिक आषाढ' तर दर २४ वर्षांनी एकदा 'अधिक भाद्रपद' येतो. आश्विन १४१ वर्षांनी आश्विन अधिक मास येतो तर ७०० वर्षांनी कार्तिक अधिक मास येतो. भाद्रपदापर्यंतच्या मासानां अधिक मास म्हणतात. आश्विन व कार्तिक अधिक आले तरी त्यास तसे म्हणत नाहीत. त्यावर्षी आश्विन अधिक होते. त्यावर्षी पौष क्षयमास होतो. अशावेळी दोन प्रहारांमध्ये मार्गशीर्ष व दोन प्रहारांना पौषमास गृहित धरून धार्मिक कृत्ये करतात.

३५५ दिवसांचे 'चांद्रवर्ष' आणि ३६५ दिवसांचे 'सौरवर्ष' यांचा मेळ घालण्यासाठी या अधिक मासाची निर्मिती झाली, हे निश्चित. अधिक मासाला **'प्राकृत'** आणि **'संसर्प'** अशाही नावाने ओळखतात.

या मासाची पुरुषोत्तम म्हणजे विष्णू ही देवता मानली असून त्याच्या कृपेसाठी पुढील कृत्य करण्यास सांगितले आहे. पूजा, पापक्षालनासाठी मलमासव्रत, प्रत्येक दिवशी अनारसे इ. पक्वान्ने तेहतीस या संख्येने कांस्यपात्रात भरुन पात्रासह त्यांचे दान, पादत्राणे व छत्री यांचे दान, सुवर्णदक्षिणा, इ. महाराष्ट्रात अधिक मासातले अनारशांचे वाण बहुधा जावयाला देतात. कन्या व जामात यांना लक्ष्मीनारायण स्वरूपी मानले आहे. त्यातून ही पध्दत आली असावी.

भगवान नारायणांनी नारदाला, विष्णूनी लक्ष्मीला, श्रीकृष्णांनी पांडवांना अधिक मासाचे पौराणिक उल्लेख आढळतात. सर्व कथा व्यासमुनींनी लिहून ठेवलेल्या बृहन्नारदीय पुराण पद्मपुराणात हे संदर्भ आढळतात. पांडवांनी हैहय प्रांतातील दृढधन्वा राजा आणि राणी गुणक्षुरटी त्याचप्रमाणे सौभाग्य नगरातील चित्रबाहू राजा आणि धर्मशर्मा यांनी अधिकमास व्रत केल्याचे पौराणिक उल्लेख आढळतात.

वर्षभर श्रम केल्यामुळे सर्व ऋतु आपली गती करून या काळावधीत सूर्याचा पाहुणचार घेतात, असे ऋग्वेदात म्हटले आहे.

अधिक मास माहात्म्य नावाची प्राचीन पोथी एकूण ३३ अध्यायांनी नटलेली आहे. आजही या पोथींचे गावोगांवी, मंदिरात, सार्वजनिक ठिकाणी, सभागृहात, खेड्यापाड्यातून वाचन होते. ऋषीमुनींचा मेळावा, मलमास कथा, दुर्वासमुनी मेधावती भेट, दृढधन्वा राजाची कथा, सुदेव गौतमी कथा, शुक्रदेव पुत्रकथा, नृगराज उध्दार, चित्रबाहु राजाची कथा, मौनव्रत, पंचपर्व, स्मित विलासनीची कथा, धर्मशर्माची कथा, विप्रदास, सोमशर्मा, काशीदेवता, उद्यापन विधी, सुमती राजाची कथा, कदर्याची कथा, नर - वानराचा उध्दार आदि कथांचा समावेश मूळ अधिक माहात्म्य ग्रंथात आहे. या अधिकमासात गोग्रास, अपूपदान, दीपदान वैगरे दान माहात्म्य सांगितले आहे. छिद्र असणारे पदार्थ म्हणजे अनारसे, बत्तासे वगैरे वस्तू ३०+३ (तेहतीस) अशा प्रमाणात दान करण्याची प्रथा आढळते. ही दान काश्य धातूच्या भांड्यातून करावीत. दांपत्यभोजन, आवळी स्नान आदी व्रते आहेत.


वेदाच्या ज्या भागात अधिकाचा उल्लेख आहे. तो सन १५०० वर्षाच्या सुमाराचा असावा, असे जाणकारांचे म्हणणे आहे. अधिक मास धरण्याची पध्दती भारतात प्रचलित असावी, असे वाटते. प्राचीन काळापासून शुद्ध प्रतिपदेला देवासमोर पाट, कलशपूजन, पुरुषोत्तम राधिकेसह श्रीकृष्ण मूर्तींची पूजा संकल्पयुक्त करुन व्रत आरंभ करावा. अधिक कृष्ण अमावस्येला व्रत उद्यापन करावे.

या मासात अग्लाधान, देव प्रतिष्ठा, राज्याभिषेक, विवाह, उपनयन, गृहारंभ, गृहप्रवेश, व देशांतर यात्रा यांना वर्ज्य काळ ठरविले आहे. अधिक मासात मृत झालेल्यांचे श्राध्द व महालय शुध्द मासात ज्या - त्या तिथीला करतात.

♦

---

## सहवेदना



### कै. अश्विनीकुमार दत्तात्रेय मराठे यांचे निधन

आपले ज्येष्ठ कुलबांधव साहित्यिक आणि विचारवंत कै. श्री. अ.द. मराठे (पृ. २७०) तथा अश्विनीकुमार यांचे दि. २५ एप्रिल २०१८ ला रात्री १२ वाजून ५ मिनिटांनी प्राणोत्क्रमण झाले.

गेली काही वर्षे 'स्मृतीभ्रंश' आजार त्यांना झाला होता. त्यांच्या पत्नीने (सौ. सूर्याने) त्यांची सर्वतोपरी काळजी घेऊन त्यांची सेवा केली. ते ७३ वर्षांचे होते. त्यांना दोन मुली आहेत. त्यातील एक जपान देशात स्थायिक झाली आहे. ('जपान आमचा व्याही' हा लेख वाचकांना आठवत असेल कदाचित) दुसरी ठाण्यात राहते. 'हितगुज'चे ते मान्यताप्राप्त लेखक होते. संपादिका म्हणून त्यांचा विशेष लोभ होता. आपण तटस्थपणे संपादिकेचे काम उत्तम करता आणि स्वतः लिहिताही चांगल्या. 'हितगुज' अंक सर्वतोपरी उत्तम झाला आहे. विषयांची विविधता आणि वाचनीयता उल्लेखनीय आहे, असे स्वरूप जर 'हितगुज'ला मिळाले तर त्याचे रूपांतर मासिकात होईलच! ते नेहमी पत्र पाठवीत, त्यात लिहित की, तुमच्या 'संपादकीय'चं एक उत्तम पुस्तक प्रकाशित करा. अंकाच्या संपादनाबद्दल तुमचे अभिनंदन आणि अधिक प्रगतीसाठी अनंत शुभेच्छा. अशा अनंत शुभेच्छा देणारे आपले अ.द. अनंतात विलीन झाले. ही गोष्ट मनाला दुःख देते.

मराठी भाषेतील असभ्य म्हणी व वाक्यप्रचार यावर त्यांनी मौलिक संशोधन केले ते महत्त्वाचे आहे. त्यांच्या जाण्याने मराठे परिवार एका चांगल्या, उत्तम साहित्यिकाला, लेखकाला मुकला आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. अ.द. मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

---

आपले ज्येष्ठ कुलबांधव कै. जयवंत कृष्णाजी मराठे, वेंगुर्ले यांचे दि. ७ एप्रिल २०१८ ला दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी शालिनी, श्री. सुधीर आणि सुभाष हे सुपुत्र, सौ. सुनीता ही सुकन्या आणि ओंकार, रसिका, शरयू ही नातवंडे आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. जयवंत कृष्णाजी मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

---

मराठे प्रतिष्ठानच्या जुन्या सभासदांपैकी एक श्री. प्रभाकर मराठे, सिंहगड रोड, पुणे यांचे दि. ४ मे २०१८ रोजी वृद्धापकाळाने दुखःद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८६ होते. त्यांच्यापश्चात पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो. मराठे प्रतिष्ठानतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ५ वी आणि इयत्ता ८ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता ५ वी, रु. २००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/–
इयत्ता ८वी – रु. ३००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/–

२) इयत्ता १० वी – ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/– ९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/–

३) इयत्ता १२ वी –
आर्टस्/कॉमर्स :
७०% ते ८०%– रु. ७००/–
८०% ते ९०%– रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सायन्स : ८०% ते ९०% – रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/–

४) पदवी – B.A., B.Com. B.Sc.,
सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/–

५) पदव्युत्तर –M. A., M.Com., M.Sc.
प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/–
C.A., L.L.B., Enginear, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/–

६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय)
राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५००/–
याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/– तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम – रु. १००/–
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम – रु. ५००/–
- (लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.)
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी एक स्कॉलरशिप पुरुस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी ही स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत (कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ). दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

यशस्वी व पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांनी दि. ३१ जुलैपर्यंत आपापल्या गुणपत्रिकांची प्रत मराठे प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पोस्टाने अथवा info@marathepratishthan.org या ई–मेलवर पाठवावी. विजेत्यांची सूची या वर्षीच्या वार्षिक अहवालात प्रसिद्ध करण्यात येईल. तरी निकाल प्राप्त झाल्यावर लगेचच गुणपत्रिका पाठवाव्यात ही विनंती.

निकाल उशिरा लागले तर वरील मुदतीनंतर देखील गुणपत्रिका पाठविल्यास पारितोषिकांसाठी विचार होऊ शकेल. मात्र त्या परिस्थितीत प्रथम क्रमांकासाठीची पुरस्कृत पारितोषिके देणे शक्य होणार नाही. ऑगस्ट/सप्टेंबर २०१८ मध्ये होणाऱ्या या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारितोषिकांचे वितरण करण्यात येईल त्यामुळे त्याच्या १० दिवस अगोदर पर्यंत येणाऱ्या गुणपत्रिकांचाच विचार पारितोषिकासाठी होऊ शकेल याची कृपया नोंद घ्यावी.

**ई–मेल : info@marathepratishthan.org**

♦

## सुविचार

प्रत्येकाचा दिवस अपेक्षा घेऊन सुरू होतो
आणि अनुभव घेऊन संपतो.

# देणगीदार व वर्गणादार सूची

## (नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०१८)

**-: अत्यंत कळकळीची विनंती :-**

**आपण सभासदत्व शुल्क अथवा देणगी दिली असूनही आपलं नाव या यादीत नसल्यास/ आपल्याला पावती मिळाली नसल्यास कोषाध्यक्ष श्रीनिवास मराठे (भ्रमणध्वनी ९८३३२१६४६८) यांच्याशी संपर्क साधावा.**

**वर्गणीदार :**

**आश्रयदाता सभासदत्व:** रु. १०,०००/-
अंजली आशुतोष मराठे (बडोदे),

**आजीव सभासदत्व:** रु. ५००/-
संजय यशवंत (बडोदे), परिमल अभय (औरंगाबाद, महा.), संजय श्रीकांत (बडोदे), अजिंक्य श्रीपाद (भोपाळ,म.प्र.), भालचंद्र शंकर (डोंबिवली), धनेश माधव खांबेटे (नाशिक), गजानन श्रीकृष्ण खांबेटे (गिरगाव, मुं), प्रभाकर काशिनाथ (गया, बिहार), संतोष श्रीकांत (बडोदे), वनिता शैलेंद्र (दहिसर मुं), शंतनू शैलेंद्र (दहिसर मुं), तनुजा शैलेंद्र (दहिसर मुं), तन्वी शैलेंद्र (दहिसर मुं)

**हितगुज सभासदत्व: रु. २,०००/-**
मोहन गणेश (बडोदे), संजय यशवंत (बडोदे). परिमल अभय (औरंगाबाद, महा.), अजिंक्य श्रीपाद (भोपाळ,म.प्र.), विराज विनायक (वेरळ, ता.खेड, जि. रत्नागिरी), अभिषेक आशुतोष (बडोदे), रोहिणी चक्रदेव (पुणे)

**हितगुज सभासदत्व: रु. १,५००/-**
प्रभाकर काशिनाथ (गया, बिहार),

**देणगीदार:**

**शिक्षण निधी देणगी**
सदाशिव बळवंत (बडोदे) २०,०००/-, उमेश धुंडिराज मराठे (मुंबई) १५,०००/-, एअर कमोडोर (नि.) मधुकर कृष्ण मराठे (पुणे) ५,०००/-, मधुकर वासुदेव चक्रदेव (सातारा) १०००/-, प्रतिभा सुधाकर (पुणे) १,००१/-

**वैद्यकीय मदत निधी देणगी**
माधव वासुदेव (पुणे) १,०००/-

**हितगुज निधी देणगी:**
सदाशिव बळवंत (बडोदे) ५,०००/-

**वर्धापन दिनाप्रीत्यर्थ देणगी**
गजानन चिंतामण (पुणे) ५००/-, नागेश नारायण (पुणे) ५००/, वसंत कृ. (पुणे) ५००/-, श्री. सी. (पुणे) २००/, चंद्रशेखर ज. विद्वांस (पुणे) १००/-, अरुण दत्तात्रय (पुणे) १००/-, श्रीकांत मराठे (पुणे) ५००/-, उषा लक्ष्मण ताम्हणकर (निर्मला गोपाळ मराठे) पुणे, १५,०००/-, सुनिता सुधाकर गोखले (उषा गोपाळ मराठे) पुणे १५,०००/-, जयश्री विजय फडके (सुनंदा गोपाळ मराठे) १५,०००/-, श्रीनिवास गोपाळ मराठे पुणे, १५,०००/- आशा मराठे (पुणे) ५००/- विजय विष्णू (पुणे) २५०/-

**वाढदिवसाप्रीत्यर्थ देणगी**
धनश्री विजय (पुणे), ५००/-, विजय विष्णू (पुणे) ५००/- श्रीकृष्ण एस. (पुणे) ५०१/-

**अन्य कारणासाठी देणगी :**
त्र्यंबक विष्णू (पुणे) १०००/-


## हसरे हितगुज

बायको नवऱ्याला फोन करते
**बायको** : काय हो, किती वेळ झाला? आहात कुठे तुम्ही?
**नवरा** : अगं मी...
**बायको** : काही सांगू नका. तुम्हाला नुसतं भटकायला पाहिजे, वेळेत घरी यायला नको.
**नवरा** : अगं मी तुझ्या आई-बाबांच्या घरी आलोय.
**बायको** : खरंच का? मग सावकाश या... काही घाई नाही.

## सुगरणीचा सल्ला



- लाल मिरची दळायला देण्यापूर्वी तिला मोहरीच्या तेलाचा हात लावावा. वर्षभर लालरंग राहतो.



- शिरा करताना रवा निम्मा भाजल्यानंतर ओल्या नारळाचा चव घालून पुन्हा भाजावा. नंतर नेहमीसारखा शिरा करावा. जास्त चवदार होतो.

(बडोदे संमेलनातील परिसंवादातील भाषण)

# सुखी जीवनाचा मार्ग कोणता?

• आदिती उपेंद्र मराठे, पनवेल भ्रमनध्वनी – ९९६७५८४५५९

हा विषय होता 'मराठे प्रतिष्ठान'च्या परिसंवादासाठी. पाच मिनटात काय बोलणार हा प्रश्न होता सहभागी सदस्यांसाठी. वेळेच्या अभावी मुद्दे अपूर्ण राहिले म्हणून पुन्हा संधी मिळाली आम्हास. सर्वात प्रथम धन्यवाद.

मराठे प्रतिष्ठान 'हितगुज' अंकात जेव्हा संधी मिळाली लिखाणाची व व्यासपीठावर सादरीकरणाची हे सुद्धा सुखावणारे आहे. सुख व दुखं या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत दोन्ही बाजू एकाच वेळी कशा दिसणार कारण ते चलनी नाणं आहे. म्हणूनच कधीतरी सुख अनुभवाला मिळते, तर दुख भोगावयास लागते. सुख हे झेलण्यासारखे असते. सुखी जीवन जगण्यासाठी सकारात्मक रहावं.

आपल्याल्या मिळालेल्या सुख वस्तूंचा उपभोग घ्यावा आणि पुढील आयुष्यात सुख मिळवण्यासाठी प्रयत्नशील असावं.

स्वामी विवेकानंद आपल्या धर्माचा प्रचार करण्यासाठी देशी विदेशी फिरले. त्यांनी धर्माची शिकवण देऊन खूप शिष्य तयार केले अगदी निवेदितासारख्या भगिनी सुद्धा हिंदू धर्माकडे आकर्षित झाल्या. स्वामी विवेकानंद परदेशी प्रवास करत होते त्यांच्या प्रवचनातून ते रामायण महाभारतसारख्या गोष्टी सांगत. अशाच एका सभेत त्याना एका माणसाने विचारले कि, स्वामी सुखी जीवनासाठी काय करू? मी एकाग्र चित्ताने नामस्मरण करतो तरी मी सुखी नाही स्वामी नी त्यास विचारले, कशा प्रकारे करतोस? साधकाने उत्तर दिले मी खोलीचे दरवाजे बंद करतो, खिडक्या बंद करतो, पडदे लावतो, कुठलाही आवाज येणार नाही याची काळजी घेतो. स्वामीनी सांगितले तु चुकीच्या पद्धतीने करतोस. घराची दारे, खिडक्या, पडदे उघड. तुझे डोळे व कान ताण. मन उघडे ठेव, समाजाकडे बघ. कुणाला गरज लागली, काही अडचण आली तर तू स्वतःच मदतीचा हात दे. त्याने मदत मागायची वाट पाहू नकोस, स्वतःच धावत जा आणि आपल्या परीने मदत करून त्याची अडचण दूर कर. साधका उघड सर्व दरवाजे कवाडे. तुला सुख मिळेल समाधान मिळेल आणि आनंद सुद्धा मिळेल.

मला वाटत सुख हि अदृश्य गोष्ट आहे. आनंद दुसऱ्यालाच देता येतो. दुसऱ्याकडून घेता येतो. सुख आपल्यालाच मिळणार असतं. समोरच्याचं सुख बघून सुखी होणारे आहेत. समोरच्याचं दुःख बघून सुखी होणारेही आहेत. समोरच्याच्या सुखात सुख मानणे हाच सुखी जीवनाचा मार्ग असावा.

स्वामी विवेकानंद, समर्थ रामदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यासारख्या असंख्य संतानी 'सुख' ह्या विषयवार लिखाण केले आहे. आपण काय लिहिणार त्या पुढे

आमचे विचार जे थोडे मोडके, तोडके आहेत बापुडे
ते मांडिले आम्ही तुम्हा पुढे ♦

## कृतज्ञता देणगी

**'मराठे प्रतिष्ठान'चे अध्यक्ष श्री. रमाकांत माधव विद्वांस**

'बॉम्बे प्रार्थना समाज' संचालित वासुदेव बाबाजी नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर या संस्थेस मी, माझ्या आणि विद्वांस कुटुंबियांतर्फे दिलेल्या देणगी प्रीत्यर्थ संस्थेच्या नवजात बालकांच्या विभागास माझ्या दिवंगत पत्नी कै. सौ. शुभा रमाकांत विद्वांस यांचे नाव देण्याचा समारंभ शनिवार दि. २१ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी 'बॉम्बे प्रार्थना समाज' संचालित प्राथमिक शाळेत संपन्न झाला त्या संस्थेत लावण्यासाठी शुभाताईंचा फ्रेम केलेला फोटो आणि त्यांच्या जीवनाबद्दल लेख मी त्या संस्थेस सादर केला. भविष्यात त्या विभागात सुधारणा व वाढ करण्यासाठी उपयोगी पडावी या उद्देशाने माझ्या इच्छापत्रात माझ्या पश्चात या संस्थेस माझ्या आणि विद्वांस कुटुंबियांतर्फे रु.१०,००,०००/– रुपये दहा लाख या देणगीची तरतूद मी केली आहे.

तसेच, माझे दिवंगत आईवडील कै. मालतीबाई आणि कै. श्री. माधवराव उर्फ देवदत्त श्रीनिवास विद्वांस यांच्या स्मरणार्थ, बॉम्बे प्रार्थना समाज संचालित वासुदेव बाबाजी नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर या संस्थेस माझ्या आणि विद्वांस कुटुंबियांतर्फे रु.१०,००,०००/– रुपये दहा लाख आणि बॉम्बे प्रार्थना समाज संचालित द. ना. शिरूर बालकाश्रम, विलेपार्ले पूर्व, मुंबई या संस्थेस माझ्या आणि विद्वांस कुटुंबियांतर्फे रु.५,००,०००/– रुपये पाच लाख अशा देणग्यांची तरतूद पण मी माझ्या इच्छापत्रात केली आहे. या दोन्ही देणग्या, या संस्थांनी माझ्या आईवडिलांच्या स्मरणार्थ, अस्तित्वात असलेल्या सुविधांच्या सुधारणेसाठी किंवा नव्या सुविधांचा निर्मितीसाठी वापर करायचा आहे, या संस्थांत लावण्यासाठी माझ्या आईवडिलांचे फ्रेम केलेले दोन फोटो आणि त्यांच्या जीवनाबद्दल लेख मी त्यांना सादर केले.

– **श्री. रमाकांत माधव विद्वांस,** (पृ. ६२३)
माटुंगा • दूरध्वनी : ०२२ २४३०५२६०

## अधिक मासाविषयी : थोडेसे अधिक

चांद्रवर्ष व सौरवर्ष यांचा मेळ घालण्यासाठी एक अधिक महिना धरावा लागतो त्याला 'अधिकमास' असे म्हणतात. सुमारे तीन वर्षांनंतर अधिकमास येतो. याला मलमास, पुरुषोत्तम मास, धोंडामास असेही म्हटले जाते. (उपरोधिक म्हण आहे. दुष्काळात तेरावा महिना.)

भाद्रपदापर्यंतच्याच मासांना अधिक मास म्हणतात. मार्गशीर्ष, पौष, माघ कधीही अधिक महिने नसतात. अश्विन व कार्तिक अधिक आले तरी त्यास अधिक म्हणत नाहीत. ज्या वर्षी अश्विन अधिक होतो त्या वर्षी पौष 'क्षय मास' होतो. अशावेळी दोन प्रहरापर्यंत मार्गशीर्ष व दोन प्रहरांनंतर पौष मास मानून दोन्ही मांसातील धर्मकृत्ये एकाच महिन्यात करतात. या जोडमासाला 'संसर्प' असे म्हणतात. कार्तिकापुढील चार महिने अधिक मास होत नाहीत व अश्विनाच्या पूर्वी क्षयमास होत नाही.

दोन अधिक मासात कमीत कमी २७ महिन्यांचे तर जास्तीच जास्ती ३५ महिन्यांचे अंतर असते. अधिक मासः चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे १२ वर्षांनी येतात. आषाढ १८ वर्षांनी अधिक येतो तर भाद्रपद अधिक मास २४ वर्षांनी येतो. अश्विन अधिकमास १४१ वर्षांनी येतो. मात्र कार्तिक मास अधिक येण्यासाठी ७०० वर्षे लागतात. अधिक मासात ३३ या संख्येला महत्त्व असल्याने दानधर्म करतात ३३चा विचार होतो. जावयाला दान देणे पुण्यप्रद. सहस्रचंद्र मोजताना अधिक मासांची गणना महत्त्वाची ठरते.

'अधिकस्य अधिकं फलं' हे सर्वश्रुत आहे.

**– सौ. गायत्री गणेश जोशी (खांबेटे),**
मोबाईल नं.: ९८६९३३५५३६०

*('हितगुज' सप्टेंबर २०१२मधून पुर्नप्रकाशित)*

आरोग्यं धन संपदा

## भोजन कसे, कुठे व केव्हा घ्यावे?

१) चांगली भूक लागली तरच भोजन घ्यावे. चवीने व आनंदाने भोजन करावे.

२) एक वेळ नाष्टा व दोन वेळा भोजन ही एक उत्तम योजना आहे.

३) सकाळी योगाभ्यास अथवा माफक व्यायामानंतर अर्ध्या तासांनी नाष्टा, दूध अथवा एखादे पेय, त्यानंतर दोन तासांनी भोजन, भोजनाच्या साधारण एक तास अगोदर एखादे फळ, भोजनानंतर चार तासांनी एखादे पेय, नंतर दोन-तीन तासांनी सायंकाळचे भोजन असा दैनंदिन खाण्याचा, भोजनाचा कार्यक्रम असावा. काळाची गरज, ऋतुमान व वैयक्तिक आवश्यकता आदिंनुसार दोन खाण्यात योग्य ते अंतर ठेवून आवश्यक तो बदल करण्यास हरकत नाही.

४) भोजनप्रसंगी वातावरण भोजनाकुल असावे. भोजन करतेवेळी मन प्रसन्न असावे आणि संगत आनंददायी असावी.

५) अन्न नीट चावून खावे. घाईघाईने जेवू नये. भोजनासाठी यथायोग्य वेळ द्यावा. जेवताना शक्यतो पाणी किंवा इतर पेये पिऊ नयेत. जेवणानंतर अर्ध्या तासाने गरजेप्रमाणे पाणी प्यावे.

६) दुपारचे भोजन परिपूर्ण व रात्रीचे भोजन मीत व हलके असावे. दुपारच्या भोजनानंतर शतपावली करून वयोमानाप्रमाणे आवश्यकतेनुसार थोडा वेळ वामकुक्षी करावयास हरकत नाही. रात्रीचे भोजन शक्य तेवढे लवकर घ्यावे. त्या भोजनानंतर शतपावली करावी. झोपेच्या वेळी पोट हलके असणे आवश्यक आहे.

७) भोजनानंतर लगेच व्यायाम, पळणे, भरभर चालणे, उड्या मारणे अशा प्रकारच्या शारीरिक हालचाली करू नयेत.

८) भोजन प्रसंगी जेवणाकडेच लक्ष असावे. दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहता पाहता जेवणे टाळावे. मन शांत असावे. मनात विचारांचे काहूर नसावे. भावनातिरेक किंवा अनिष्ट विचार जेवणाच्यावेळी टाळावा.

९) जेवताना चित्त प्रसन्न आणि आनंदी असेल तर अन्न ग्रहणाचा अमृताप्रमाणे लाभ होतो. या उलट भोजनप्रसंगी क्रोध, द्वेष आदी विकारांची भरलेले अंतःकरण आणि मन विकृत झाले असेल तर ग्रहण केलेल्या अन्नावर विषाप्रमाणे विपरीत परिणाम होतील. म्हणून भोजनप्रसंगी मनोकायिक प्रसन्नतेची अत्यंत आवश्यकता असते.

१०) हवेशीर, मोकळ्या जागी जेवण घेणे हे नेहमीच श्रेयस्कर ठरते.

११) रात्रीच्या भोजनानंतर लगेच झोपू नये. शतपावली जरूर करावी. त्यानंतर चांगले संस्कार मनात रुजवणारे वाचन थोडा वेळ करून मन शांत व प्रसन्न ठेवत झोपावे.

वरील सर्व निषेधात्मक सूचना सर्वांना पूर्णपणे अंमलात आणता येणार नाहीत याची जाणीव आहे. पण यथा शक्य असेल त्या प्रमाणात ह्या सूचना पाळाव्यात, म्हणजे तितक्या प्रमाणात तरी आपले जीवन आरोग्य-संपन्न होईल.

♦

# कविता

• संजय रामचंद्र मराठे, (पृ. ४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

***‘‘संम्मेलन म्हणजे .... संम्मेलन म्हणजे, संम्मेलन असतं, पण तुमच आमचं सेम नसतं’’***
***मंगेश पाडगांवकरांची क्षमा मागून (‘प्रेम म्हणजे... प्रेम म्हणजे... प्रेम असतं’च्या धर्तीवर)***

संम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
पण तुमच, आमचं कधीच सेम नसतं... सेम नसतं
साहित्य सम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
अध्यक्षांच्या निवडणूकी पासून... कुस्तीचा आखाडा असतं
सरकारी मदतीसाठी,... ताकाला जाउन भांडं लपवणं असतं
सम्मेलन म्हणजे, प्रस्थापितां विरुध्द नवोदितांच...
सहृदयी विरुध्द विद्रोहिच, प्रकाशक आणि विक्रेत्यांची मंडई असतं...
साहित्य संम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
पण तुमचं, आमचं कधीच, सेम नसतं... सेम नसतं ।।१।।

कॉलेजचं असतं... शाळेचही असतं...
स्नेह सम्मेलन म्हणजे... सम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं
सी.आर.पासून... जी.एस. पर्यंतचा प्रवास असतं
राजकारणाच्या शिक्षणाचं असतं, ...अनं त्यासाठीच्या,
व्यावहारीक धडयांचं बालवाडी असतं... बालवाडी असतं
पाळणाघरां पासून आजी माजी विद्यार्थ्यांच्या अड्‌ड्याचं माहेर असतं
माहेर घर असतं... माहेर घर असतं
स्नेह संम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
पण तुमचं, आमचं कधीच, सेम नसतं... सेम नसतं ।।२।।

ज्ञातीचं असतं... कोकणस्थाचं असतं... सारस्वतांच असतं
अन ब्राम्हणांच तर... असतंच असतं, इतकंच कशाला
आद्यावांचं, गोत्रांचं, अन सगोत्रीचंही सम्मेलन असतं.
वाडया पाडया पासून... आंतरराष्ट्रीय स्तरांचही असतं
विभागीय, राज्यीय... प्रांतीय तर असतंच असतं
नमनाला घडाभर तेल जाळणारं असतं, अन्
समारोपाचं श्राद्ध चटावर उरकणारं ही असतं
संम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
पण तुमच, आमचं कधीच, सेम नसतं... सेम नसतं ।।३।।

दिवसांच... तासांच... सांजेचंही असतं
कोणतही असलं, तरी वेळेच्या बंधात अडकलेलं असतं, पण
मोबाईल आणि लॅपटॉपवर कधीही, अन कितीही वेळ असतं
पेजर आणि ट्वीटर वरं असतं, फेसबुक आणि वॉट्सअॅपवर ही असतं
अनेक ग्रुपचा अॅडमिन एक किंवा तेच ते असतात, तरी
प्रत्येक ग्रुपच कधीच सेम नसतं... सेम नसतं
संम्मेलन म्हणजे, संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं
नेट वर ऑन लाईन असतं... ऑफ लाईनला ही असतं
संम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
पण तुमच, आमचं कधीच, सेम नसतं... सेम नसतं ।।४।।

शैक्षणिक असतं... क्षणिक असतं... क्षणभंगुरही असतं
पेपर वाचनांच असतं... संगोष्टी सारख्या न कळणा-या गोष्टींच असतं
वायफळ चर्चेचं असतं... चर्चेत राहणारं ही असतं
म्हटलं तर, व्यासपीठ असतं... विद्वतेच प्रतिक असतं
उपस्थिती नाममात्र, शुल्कात विचित्र आणि
प्रमाणपत्र वितरणांत अहोरात्र, असहीं असतं
संम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
पण तुमच, आमचं कधीच, सेम नसतं... सेम नसतं ।।५।।

आयोजकांसाठी तुबंडया भरु असतं... कधी कधी त्यांना चुना लावणारं असतं
हौश्या, गौश्या, नौश्या, अन मिरव्यांच गारुड असतं... गारुड असतं
जाहिरात बाजीचं भारुड असतं... भारुड असतं, अन
दिखावू सौंदर्याच्या प्रदर्शनाचं भुल-भुलैया असतं... भुल-भुलच्या असतं
संम्मेलन म्हणजे... संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं,
पण तुमच, आमचं कधीच, सेम नसतं... सेम नसतं ।।६।।

कोणतंही असलं तरी, आपलं संम्मेलन म्हणजे,
संम्मेलन म्हणजे... संम्मेलन असतं, आणि
तुमचं, आमचं, सेम असतं... अगदी सेम-टू-सेम असतं.

♦

# सद्‌गुण विकृती सोडली तरच हिंदु समाज विजयी होईल

'सद्‌गुणविकृती' हा शब्दप्रयोग स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदु समाजाच्या दोषाचे सार्थ वर्णन करण्यासाठी योजिला आहे.

वस्तुतः मनुष्याची माणुसकी म्हणून सांगण्यात येणारे सर्व सदगुण, ते केवळ 'गुण'च असतात. कोणताही एक गुण सर्व परिस्थितीत सद्‌गुणच असतो असे नाही. व्यवहारात, कोणताही गुण हा जेव्हा मनुष्यजातीच्या हितास उपकारक ठरतो तेव्हा तितक्याच मर्यादेपर्यंत, तो सद्‌गुण समजला गेला पाहिजे.

जेथून तोच गुण मनुष्याजातीच्या घातास किंवा अधःपातास कारणीभूत होतो तेथून त्या गुणाचे दुर्गुणांत रुपांतर होते. त्या परिस्थितील तो त्याज्य ठरतो. म्हणूजच, देश, काल, पात्राच्या विवेकाची कसोटी आवश्यक ठरते.

शरणागताला जीवदान देणे, हा सद्‌गुण म्हणून काही पोथ्यांतून सांगीतला आहे. यासाठी महामंद घोरी, नजीबखानसारख्या अनेक दुष्टांना ते हाती लागले असतानाही जिवंत सोडून दिली आहे. ही झाली सद्‌गुणविकृती पृथ्वीराजाने ज्या महमंद घोरील २१ वेळा युद्धात पराभूत करुन पकडले, परंतु प्रत्येक वेळी त्याला जीवदान दिले, त्याच महंमद घोरीने अखेरच्या एका लढाईत विजय मिळविला पृथ्वीराजाला पकडले आणि पृथ्वीराजाला ठार मारले!

हिंदूंची देवमंदिरे मुस्लिम राक्षस धडाधड पाडीत असतानाही, सोमनाथा सारख्या पूज्य मूर्ती विध्वंस करीत असताना ही, केवळ, साधूसंतांनी अशा अपमानाचा सूड न घेता, स्वस्थ बसावे; असा उपदेश केल्याने, अनुकूल परिस्थिती आली असताही हिंदूंनी त्या दुष्ट मुसलमानांचा सूड घेतला नाही, वचपा काढला नाही. मशिदीचा एक चिराही उखडला नाही.

'परधर्म सहिष्णुता हा सद्‌गुण आहे' हे बोधामृत प्रत्येक हिंदूला अगदी आईच्या दूधासह पाजलेले असते.

जर तो परधर्म आपल्या हिंदूधर्माशीही सहिष्णुतेने वागलेला असेल तर अशा परधर्माशी आपणही सहिष्णुतेने वागणे सद्‌गुण ठरू शकेल.

परंतु, हिंदुधर्माचा सदैव विनाश, काफरांचा भयानक उच्छेद, हाच आमचा धर्म होय, असे म्हणणाऱ्या मुस्लिमांच्या किंवा ख्रिश्चनांच्या धर्मास सहिष्णुता दाखविण्याची आवश्यकता नाही. मुस्लिम किंवा ख्रिश्चनांच्या असहिष्णु कृत्यांचा प्रतिकृत्याने आणि अत्याचारांचा अत्याचाराने (जशास तसे) प्रतिशोध-सुज घेणारी संकृद्ध असहिष्णुता हाच खरा सद्‌गुण होय.

मुस्लिम आक्रमकांनी मथुरेची किंवा काशीची मंदिरे उद्‌ध्वस्त केली. देशातील अनेक मंदिरातील मूर्ती उखडून मुस्लिम प्रासादांच्या पायऱ्या चिणून टाकल्या. अधिकाधिक विटंबना करण्यासाठी उपयोग केला. देवांच्या मूर्तींचा शौचालयांची फरशी करण्यासाठी उपयोग केला. अशा अत्याचारांना धर्म मानणाऱ्या मुस्लिमांच्या मशीदींना तेथे हिंदूची राजसत्ता पुन्हा आल्यावर भरडून काढणे, त्यांचा विध्वंस करणे हे कर्तव्य ठरते.

परंतु दुदैव असे की मुस्लिम आक्रमकांनी मंदिरे उद्‌ध्वस्त करून तेथे पाडलेल्या मशिदींना नंतर आलेल्या हिंदुसत्तांनी नवीन उत्पन्ने लावून दिली! त्यांचे रक्षण करण्याचे दायित्व स्वीकारले! (उदा. सोमनाथचे देवालय). हिंदु राजाने तेथेच मुस्लिमांना नवी मशीद उभारू दिली. हे हिंदूंच्या बावळटपणाचे उत्तम लक्षण ठरले. (भारताने काश्मिर प्रकरणी एकतर्फी केलेला युद्धविराम त्याच प्रकारात मोडतो.)

अर्थात त्यानंतर अल्लाउद्दीन आदि मुस्लिम आक्रमकांनी गुजराथवर स्वाऱ्या करुन सहस्त्रावधी हिंदूंची सरसकट कापाकापी केली. सहस्त्रावधी स्त्रियांवर बलात्कार केले. आणि शतावधि हिंदु मंदिरे उद्‌ध्वस्त केली. विशेष म्हणजे सोमनाथच्या हिंदुराजांनी ज्या अरबी व्यापाऱ्यांना मशिद उभारून दिली. त्यांनी अल्लाउद्दीनला सोमनाथ मंदिरे उद्‌ध्वस्थ करण्यात मदत केली! सोमनाथच्या मूर्ती आणि गाभाऱ्यातील शिला मुस्लिमांनी दिल्लीला नेऊन तेथील एका मशिदीच्या पायऱ्यात चिणून टाकल्या!!

संकलनः- **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**

**जिजाबाईचा शिवबाला उपदेश**

**आपत्सु रामः समरेषु भीमः**
**दानेषु कर्णश्च नयेषु कृष्णः।**
**भीष्मः प्रतिज्ञापरिपालनेषु**
**विक्रान्तकार्येषु भवान् आंजनेयः।**

(शिवबा!) संकटकाळी राम, युद्धभूमीवर भीम, दानाच्या बाबतीत कर्ण, नीतीच्या बाबतीत कृष्ण, प्रतिज्ञा पार पाडताना भीष्म आणि पराक्रम गाजवताना हनुमान हो.

*(-श्रीशिवराज्योदयम् - डॉ. श्री. भा. वर्णेकरकृत महाकाव्यातून)*

# असे निघाले पहिले वधु-वर संशोधन मंडळ

• श्री. अच्युत म. चक्रदेव, (पृ. ७३२), पुणे भ्रमणध्वनी : ९६२३५५०६३३

माझे वडील ती.कै.महादेव हरी चक्रदेव यांचा स्वभाव तसा रागीटच म्हणावा लागेल. अगदी तरुण वयांत म्हणजे वयाचे १९वे वर्षीच त्यांना वानवडी येथे मिलिटरी अकौंट्समध्ये नोकरी मिळाली.

पहाटे साडेचारला उठून शौचमुखमार्जनाहि सोपस्कार व इतर कार्यक्रम उरकून ते पायीच वानवडीला जात. ही हकीकत १९१९-२० सालची बस, रिक्षा, टॅक्सी इ. वहाने अजून सुरु व्हायची होती. फक्त टांगे होते. पण रोज टांगा करून जाणे परवडण्यासारखे नव्हते. म्हणून टांगा टाकत वेगाने जाणे हेंच फक्त परवडण्यासारखे होते.

नाही म्हणायला सायकल उपलब्ध होती. पण वडील सायकल शिकले नव्हते. वानवडीला रोज चालत जाणे, चालत परत येणे हा दिनक्रम सुमारे दोन वर्षे चालू होता. अकस्मात वडिलांची बदली बढतीवर इंग्रज अधिकाऱ्यांनी पुण्याहून क्वेटा येथे केली. घरांत वृद्ध वडील, एक घरी परत आलेली विधवा बहीण, अद्याप शिक्षण चालू असलेले दोन लहान भाऊ या सर्वांना सोडून एवढ्या लांब जाणे, शक्यच नव्हते. त्यांनी बदली रद्द करण्याचा बराच प्रयत्न केला पण यश आले नाही. राजीनामा द्यावा लागला.

पण, लवकर भारत इन्शुरन्स कंपनीत जिल्हा व्यवस्थापक म्हणून नोकरी मिळाली. तेथे वरीष्ठांशी पटले नाही, म्हणून राजीनामा दिला. कांही काळ रिकामा गेला. या काळांत, भिक्षुकी, एका दशण्या, आवर्तने करण्यांत गेला. या काळवधींत त्यांनी सहा विवाह जमवले. गरजू लोक त्यांच्याकडे येवू लागले. वडिलांनी माहीत असलेल्या स्थळांच्या याद्या जमविल्या. हे सर्व घरांतच चालू होते. येणाऱ्या जाणाऱ्या जाणाऱ्यांचा राबता वाढला. येणारे लोकही स्थळे सुचवू लागले. हा काळ सन १९३५ चा पुण्यांत नव्यानेच कॉमनवेल्थ इन्शुरन्स कंपनी सुरु झाली. त्या कंपनीचे एक संस्थापक संचालक श्री.म.जोशी यांचा विवाहहि वडिलांनीच जमविला. ते म्हणाले, चक्रदेव, हे किती दिवस करत बसणार? मी नव्याने सुरु केलेल्या कंपनीत या.

वडील म्हणाले, ''मी कंपनीत अवश्य येतो. पण विवाह जमविण्याचे माझे हे काम मी फावल्या वेळेंत चालूच ठेवणार आहे. साधारण १९२५ सालीच सुरु केलेले हे विवाह जमविण्याचे काम सुरु करणारे माझे वडील हे वधुवर संशोधन कल्पनेचे मूळ प्रवर्तक असावेत असे राहून वाटते मुद्दाम नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे वडिलांना या काळांत त्यांचे निकटचे स्नही श्री.मोरेश्वर भातखंडे, उभयतां यांनी खूपच जाणीवपूर्वक मदत केली. वडील या कंपनींत १९६० पर्यंत टिकून राहिले. वडीलांचे दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे ते त्या काळाच्या नेत्यांच्या आवाजाच्या नकला हुबेहूब करीत असत. उदा. साहित्य सम्राट न.चिं.केळकर, शि.म.परांजपे, कार्यकर्ते, अहिताग्नी राजवाडे इ.

त्यांचे कार्यक्रमही स.प.महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय इ. ठिकाणी झालेले आहेत.

तसे अहवाल त्यावेळेच्या केसरी, ज्ञानप्रकाश सकाळ इ. मध्ये आलेले आहे. ♦

## अ.द. मराठे यांचे निधन

राज व्यवहार कोशकर व विविध पुस्तकांचे अभ्यासपूर्ण परीक्षण करणारे म्हणून नावारूपाला आलेले अश्विनीकुमार दत्तात्रेय मराठे उर्फ अ.द. मराठे यांचे त्यांच्या राहत्या घरी वयाच्या ७१व्या वर्षी निधन झाले. स्मृतिभ्रंश किंवा अल्झायमर या आजाराने ते गेली तीन वर्षे अंथरुणाला खिळून होते. मराठे यांनी राजापूर व ठाणे येथे संस्कृत, मराठी व इंग्रजी व अध्यापनाचे काम वीस वर्षे केले. त्यांचे सहकारी त्यांना 'प्रोफेसरांचा प्रोफेसर', 'चालता बोलता ज्ञानकोश' असे आदरपूर्वक म्हणत असत. महाराष्ट्र टाइम्ससह अन्य दैनिकांतून १००हून जास्त पुस्तकांची परीक्षणे त्यांनी केली. इतिहासकारांना मार्गदर्शक व्हावा म्हणून त्यांनी राज व्यवहार कोशाची निर्मिती केली. राज व्यवहार कोशाला पुणे महानगरपालिकेचा पुरस्कार मिळाला. अनेक संस्कृत भाषेतील पुस्तकांचे मराठी अनुवाद त्यांनी केले. मराठी भाषेतील 'असभ्य म्हणी आणि वाक्यप्रचार' याविषयी माहितीपर कोश तसेच 'विद्वशालभञ्जिका' या मूळ राजशेखरलिखित कथासंग्रहाचा मराठी अनुवादित केला. गदिमांचे गीत रामायण व महर्षी वाल्मिकींचे रामायण यांतील साम्य याविषयी त्यांनी लिखाण केले आहे. सेतुमाधवराव पगडी, रा.चिं. ढेरे, म.श्री. दीक्षित, अरूणा ढेरे, दुर्गांबाई भागवत, रवींद्र थत्ते अशा अनेक दिग्गजांशी त्यांचा स्नेह होता. मराठे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने संस्कृत व इतिहासातील एक विद्वान हरपला आहे.

*(म.टा.वरून साभार ४ मे २०१८)*

तृतीय पारितोषिक प्राप्त लेख

# बडोदे संमेलनाने आम्हाला काय दिले?

• अनंत मराठे, अंधेरी भ्रमणध्वनी : ९८३३९४४९१३

दि. ७ जानेवारी २०१८ रोजी बडोदे येथे संपन्न झालेल्या मराठे प्रतिष्ठानच्या ११व्या अखिल भारतीय मराठे कुलसंमेलनास प्रत्यक्ष हजर राहून संपूर्ण अप्रतिम कार्यक्रमाचा आनंद लुटला आणि खूप समाधान झाले. ह्या कार्यक्रमाने/संमेलनाने आपणास काय दिले. ह्यासंबधी माझे विचार मी खाली नमूद करत आहे.

१) इच्छा शक्ति आणि जिद्द असेल तर कुठलीही गोष्ट साध्य करणे शक्य आहे.

२) खंबीर आणि मनमिळाऊ नेतृत्व असेल तर सहकारी संघटीत होऊन एकजुटीने काम करून उद्दिष्ट पार करू शकतात.

३) कामाची योग्य आखणी आणि त्याचे नियोजन मिळून सल्ला-मसलतीने केले तर कृतीत आणण्यास त्रास होत नाही आणि सर्वजण हसतमुखाने कार्यभार उचलतात.

४) हाती घेतलेल्या कार्याचा आवाका बघून प्रत्येकाने घरचे कार्य समजून पदरमोड केल्यास तसेच स्मरणिकेसाठी जाहिराती मिळवून निधि संकलन केल्यास कार्यक्रम सुरळीत आणि व्यवस्थित पार पडतो.

५) कार्यक्रमाचे वेळेचे योग्य नियोजन केल्यास ठरलेल्या वेळेत कुठलीही घाई न होता कार्यक्रम पार पडतो आणि कंटाळवाणा होत नाही.

६) संमेलनास येणाऱ्या अतिथिच्या उत्कृष्ट चहा, नाष्टा आणि जेवणाचे व्यवस्थापन असेल तर प्रेमाची आणि तृप्ततेची अतिथिंची थाप कार्यकर्त्यांच्या पाठीवर निश्चित पडते.

७) उत्कृष्ट, रेखीव आणि वाचनीय 'स्मृतीगंध' स्मरणिका ♦

# माझ्या जीवनातील वसंतबहार

• **सौ. ज्योती सुधीर शेठ, (पृ ५७)** (सौ. साधनाताई मराठे यांची सुकन्या), **महाड** **भ्रमणध्वनी : ९८२३७६६०८९**

वसंत ऋतुच्या प्रसन्न आगमनासोबतच जीवनातील पालककट्टा या अभिनव विषयावर लेख लिहीणारा प्रेरणा देणाऱ्या कल्पक संपादकाचे मनःपूर्वक आभार प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी वसंतबहार येतो. आणि आठवणीचे मोरपीस आयुष्यभर मनात जपून ठेवण्यास जीवन रंगीबेरंगी बनविण्यास कारणीभूत ठरतात.

निसर्ग आणि स्त्रीपुरुष यांना परमेश्वराने सृजनशीलतेची सर्जनाशिलतेची देणगी दिली आहे. वंशवाढ करण्याची फार मोठी सृजनशीलता हा त्याचा खूप मोठा अविष्कार इतर सर्वसामान्याप्रमाणे आमच्या दोन्हीही अपत्यांचा जन्म आणि त्यांच्या वाढीचा काळ म्हणजे माझ्या आयुष्यातील वसंत बहारच म्हणावा लागेल. आईबाबाच्या भूमिकेतून नेणाऱ्या या वसंतबहराने आपले जीवन उजळून जाते. त्याचे बालपणातले हट्ट बाजारातून सुट्टीच्या दिवशी चक्कर मारून भेलपुरी पाणीपुरी आईस्क्रीम खाताना‍चे समाधानी चेहरे. जत्रेतल्या बाहुलीची ढोलक्याची बाहूलीची खरेदी. पहिले बक्षीस घ्यायला जाताना असणारी उत्सुकता.

पालक म्हणून निकाल आणायला जाण्याची ओढ. थोडासा घरी यावयास उशिर झाल्यास कावरेबावरे झालेले मन. आणि मुलांच्या प्रगतीचा उंचावणारा आलेख पाहण्यासाठी आसुसलेले डोळे आणि सतत काळजी करणारे मन. या सर्वच गोष्टी अपत्याच्या बदलात सर्व आईबाबांना वारशाने मिळतात. पण आईबाबा झाल्याशिवाय ह्या सर्व गोष्टी अनुभवता येत नाहीत. आयुष्यातल्या वसंतबहाराने आपल्याच मुलासोबत परत मुल होण्याचे. बालपणांत जगण्याचे अनुभवता येते. याच काळात अपत्यांशी रेशमी पण चिवट नातेसंबंध दृढ होतात. लेक असेल तर चारचार वेळा पसंत न पडलेली वेणी घालून देण्याची चिकाटीही निर्माण होते. न थकता मुल आजारी पडले तर रात्ररात्र त्याची शुश्रूषा करण्याची त्यागी वृत्ती निर्माण होते. दिवस दिवसभर राबून विविध पदार्थ मुलांना करून घालण्यासाठी अन्नपूर्णेचा आशिर्वाद मिळतो. मुलांच्या शाळेच्या निमित्ताने कोऱ्या पुस्तकांचा गंध नाकांत दरवळतो. अंगणांत घरात हवहवस लोभस वाटणारं वातावरण निर्माण होत. दहावी बारावीच्या निकालाशी पुन्हा नकळतपणे आपली जवळीक होते. आरश्याशी दोस्ती करणाऱ्या तरुणाईमुळे परत तारूण्य अनुभवता येते. आणि आयुष्यभर मनोभावे जपलेल्या सुसंस्कारीत मुलांना घडविण्याच्या वंशाला पूर्णत्व आले की मिळतो. एक कृतार्थ जीवनाचा आनंद जो फक्त स्वतःच्या निर्मितीचा असतो. त्यांना दिले जाते पंखात बळ उंच आकाशात भरारी मारण्यासाठी. या सर्वच वसंतबहारातून मिळते नवनिर्मितीची अखंड प्रेरणा. मुलांना वाढविताना प्रत्येक टप्यावर आईबाबा म्हणून आपल्यामध्ये होणार परिवर्तन. स्वभावाला नकळतपणे पडलेली मुरड तीही गोड मनापासून स्विकारलेली. मुलांच्या छोट्या मोठ्या आनंदात अगदी सहजतेची होणारी मनाची फार मोठी गुंतवणूक आणि या सर्व गुंतवणूकीतून मिळणारे चक्रवाढ व्याज. अपूर्ण आनंद देणारे आणि जीवनाच्या उत्तरायणामध्ये अखंड सोबत करणारे भरपूर आठवणीचे गाठोडे आयुष्यभर पुरणारी अनोख्या आठवणीची शिदोरी. ♦

# वाचकांचा पत्रव्यवहार

नमस्कार,

रविवार दि. ४ फेब्रुवारी रोजी मराठे प्रतिष्ठानच्या पुणे शाखेचा वर्धापनदिन साजरा झाला. या संबंधात काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. त्याची नोंद घ्यावी ही विनंती.

१. कार्यक्रमाचे आयोजन अतिशय विस्कळीत होते. कार्यक्रमाची माहिती देणारा फोन आला होता त्यांनी सांगितलं की वेळ साडेचार दिली आहे, पण तुम्ही पाच सव्वा पाच पर्यंत आलात तरी चालेल? कार्यक्रम वेळेवर सुरु करायचा नाही असं आधी ठरलं होतं का? लोक वेळेवर येत नाहीत म्हणून सुरुवात उशीरा आणि उशीर होतो म्हणून कुणी वेळेवर येत नाही.

हे दुष्टचक्र निदान खाजगी कार्यक्रमात तरी नसावं. जे वेळेवर येतात त्यांच्या वक्तशीर असण्याची कदर आयोजकांनी करायला नको का? एकदा-दोनदा वेळेवर सुरु झाला की पुढच्या वेळी लोक आपोआप वेळेवर येतील.

२. कार्यक्रम स्थळाचा पत्ता देतांना तो अपुरा दिला गेला. - २०४६, सदाशिव, हॉटेल विश्वकल्पना च्या समोर. जे मूळ पुणेकर आहेत त्यांना घर नंबरावरूनपत्ता शोधायची सवय आहे किंवा कोणते सभागृह कुठे आहे ते माहित आहे. पण बाहेरून येऊन पुण्यात स्थायिक झालेल्यांना घर नंबरावरून पत्ता शोधता येत नाही. हॉटेल विश्वकल्पना असं लिहिल्यामुळे गुगल map मध्ये पत्ता मिळाला नाही. कारण विश्वकल्पना असं एक नाव नसून विश्व आणि कल्पना अशी दोन वेगळी नावं आहेत. कारण दोन वेगळी हॉटेल्स आहेत.

परिणामी अर्धी सदाशिव पेठ फिरुन आम्ही समारंभाला पोचलो.

३. मुख्य कार्यक्रम मुळात उशीरा सुरु झाल्यामुळे पुढे गाण्याचा कार्यक्रम आवरता घ्यावा लागला. आणि नंतर डॉ. परांजपे यांचा कार्यक्रम पूर्ण सादर झाला.

प्रत्यक्षात गाण्याचा कार्यक्रम चांगला होता आणि परांजप्यांचा कार्यक्रम निव्वळ बालिश, रटाळ आणि कंटाळवाणा होता. दोन कार्यक्रम कशासाठी ठेवले ते कळत नाही. गाण्याचा एकच कार्यक्रम पूर्ण झाला असता तरी चाललं असतं. त्यांना पूर्ण न्याय मिळाला असता आणि नंतर कंटाळवाणं झालं नसतं.

४. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहार होता. अशा कार्यक्रमांना अधिकतर उपस्थिती ज्येष्ठ नागरिकांची असते. पण अल्पोपहार मटार उसळ आणि पाव आणि गुलाबजाम असा होता. रात्री आठ वाजता 'पाणीदार' मटार उसळ खाऊन कुणाला त्रास होऊ शकतो. हा अल्पोपहार प्रतिष्ठानतर्फे न देता सरळ काही शुल्क आकारून चांगला देता आला असता.

कार्यक्रम घरगुती स्वरूपाचा असला तरी त्याचं आयोजन व्यवस्थित असायला हवं. तरुण वर्ग इकडे वळत नाही, कार्यकर्ते ज्येष्ठ नागरिक आहेत, त्यांना सगळं पार पाडणं कठीण जात असेल हे समजण्यासारखं आहे. पण मग उघड एखादा व्यावसायिक कार्यक्रम आयोजित करावा, प्रतिष्ठानच्या सभासदांना निम्म्या किंमतीत किंवा विनाशुल्क तिकीट देऊन बाकी कार्यक्रम नेहमीप्रमाणे सादर होऊ द्यावा.

यावर्षी बडोदे संमेलनाला जाता आलं नाही. तर आता या कार्यक्रमाला जावं असा विचार करून आम्ही आलो होतो. पण पूर्ण निराशा झाली असे खेदाने म्हणावे लागत आहे.

या मेलचा उद्देश टीका करणं, नावं ठेवणं असा नसून नेमकं काय बिनसलं ते दाखवण्याचा आहे. कृपया गैरसमज नसावा.

**- सौ. राधा श्रीकांत मराठे**

## किशोरीताईंचे स्मरण



'सूर नवा ध्यास नवा' या कलर्स मराठीच्या कार्यक्रमात प्रत्येक गायक/गायिका जीवतोड मेहनत करतात. परंतु स्पर्धा म्हटली म्हणजे निकालानुसार एक एक स्पर्धकाला स्पर्धा सोडावी लागते. तेव्हा स्पर्धकांना जेवढे वाईट वाटते तितकेच रसिकांना. कारण प्रत्येक स्पर्धकाने काही खास गाण्याची छाप रसिकांवर टाकलेली असते. शरयू दाते हिने गायलेल्या 'सहेला रे' या गाण्याचा असाच उल्लेख करावा लागेल. किशोरीताईंची 'भूप' रागातील चीज पेलणे सोपे नाही. पण शरयूने ते आर्ततेने, उत्कटतेने आणि समरस होऊन म्हटले. ते थेट काळजास जाऊन भिडले. अजूनही ते सूर कानात घुमत आहेत. आज किशोरीताई असत्या तर त्यांनी नक्कीच शरयूला शाबासकी दिली असती.

**- गुरुनाथ वसंत मराठे**, बोरिवली (पूर्व)

प्रकाशझोत

# जिज्ञासू वृत्तीच्या बडोद्याच्या सौ. दीपिका हेमंत मराठे

(पृ.क्र. ३८०)



सौ. दीपिका हेमंत मराठे या जयपुरच्या अभ्यंकरांची माहेरवाशीण व बडोद्याच्या श्री सदाशिव बळवंत मराठे यांची स्नुषा. दिनांक ०२/०६/१९८६ रोजी विवाह होऊन त्या मराठ्यांच्या घरात आल्या. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी बी. ए. केलं आहे. अभ्यंकरांच्या घरात सर्वात मोठ्या असल्याने घरातील सर्व जबाबदारी त्यांनी उचलली होती. मुळातच सर्व काही शिकून घेण्याच्या जिज्ञासू वृत्तीने त्यांना लग्नानंतरही स्वस्थ बसू दिले नाही व त्यांनी एक शाळेत बाल मंदिरच्या मुलांना शिकविण्याची नोकरी केली. जयपुरला हिन्दी भाषेचा प्रभाव असूनही त्यांनी तोडक्या - मोडक्या गुजराती भाषेत काम करायला सुरवात केली.

नंतर मराठ्यांची पण सर्वात मोठी सून असल्याने सर्व जबाबदाऱ्या त्यांच्यावरच पडल्या. हे सगळं निभावत असताना त्यांची शिकाऊ वृत्ती त्यांचं मन चाळवत होती. त्यांनी घरीच वेगवेगळ्या प्लॅस्टिकच्या फुलांचे गजरे, हार, तोरणं करायला सुरुवात केली. बडोद्यातील अनेकांनी ते विकत घेतले व त्यांचा हुरूप वाढला. नंतर त्यांनी अक्रेलिकच्या तुकड्यांची रांगोळी बनविण्यास सुरुवात केली. स्वत:च्या विविध कल्पनांनी त्यांनी वेगवेगळ्या आकाराच्या व रंगांच्या रांगोळ्या बनविल्या, ज्या सर्वांना खूप आवडल्या व भेट वस्तू म्हणून लोक त्या देऊ लागले. निरुपयोगी वस्तूंपासून त्यांनी आकाश कंदील, पेन्सिल बॉक्स, पायपुसणी, टेबल मॅट, वॉलपीस अशा अनेक सुंदर कलात्मक वस्तु बनविल्या आहेत. याच वेळी त्यांना एका specially abled childrenच्या शाळेत काम करण्याची संधी चालून आली व त्या संधीचं त्यांनी सोनं केलं.

२००७ पासून त्या दिशा स्पेशल स्कूल अँड ओटीझम सेंटर मध्ये आर्ट थेरपिस्ट म्हणून कार्यरत आहेत. त्या औटिस्टिक, मंदबुद्धि, अंध, मुक-बधिर मुलांसोबत हे कार्य करतात. त्यांना वेगवेगळ्या कला म्हणजे चित्रकला, पेपर वर्क, रंगबिरंगी पणत्या, दिवे, पाकिटं, कागदाच्या पिशव्या असं बरंच काही शिकवितात. या मुलांसोबत काम करणं, त्यांना काही शिकविणे हे खूपच अवघड कार्य आहे. पण त्या नेटाने, प्रेमाने, मुलांच्या कलाकलाने घेत शिकवितात, त्यामुळे मुलांच्याही त्या आवडत्या शिक्षिका आहेत. २०१७ मध्ये या मुलांकडून तयार करून घेतलेल्या वस्तूंचे प्रदर्शन बडोद्याच्या faculty of fine arts मध्ये ठेवण्यात आले होते, ज्याला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. गेल्या ९ वर्षांपासून ही मुले दिल्ली येथे होणाऱ्या very स्पेशल art competition मध्ये भाग घेतात व प्रशंसापत्र ठरतात. त्याचे श्रेय दिशा 'स्पेशल स्कूल अँड ऑटीझम सेंटर'च्या इतर शिक्षकांसोबत सौ. दीपिका मराठे यांनाही जाते.

या शिवाय त्या उत्तम गृहिणी आहेत, त्यांचं पाक कौशल्य उत्कृष्ट आहे. नाते संबंधांना उत्तमरीत्या सांभाळत त्या नवनवीन तंत्रज्ञानही शिकून घेतात आणि म्हणूनच त्या आज नव्या पिढीच्याही जिवलग मैत्रीण ठरतात.

त्यांनी मुलांकडून करवून घेतलेल्या काही कलाकृती व त्यांनी केलेल्या काही कलाकृती यासोबत पाठवत आहे.

या पुढील वाटचालीसाठी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा.

♦





## साभार पोच


**• भगवंताकडे वाटचाल**

लेखक : योगीदास श्री. वसंत नारायण मराठे
खाजगी वितरणासाठी, किंमत मूल्य नाही.
पत्ता : श्री. वसंत नारायण मराठे
(तथा योगिदास), श्री विष्णू निवास, पाचवा मजला, घंटाळी मंदिरासमोर, घंटाळी,
ठाणे – ४०२०६०२
दूरध्वनी – २५३३१२०३/२५३३६६३३/
२५३३१०९९ भ्रमणध्वनी– ९००४०९६९०३




**• श्रीमहादेवी स्तोत्र**

लेखक : योगिनाथ श्री. वसंत नारायण मराठे




**• कवडसे**

लेखक : विक्रम नारायण सावरकर
(कथासंग्रह आणि ललित साहित्य, व्यक्तिचित्रीणे)
प्रकाशन : मनोरमा
प्रथमावृत्ती : श्री दत्तजयंती,
१३ डिसेंबर २०१६
पृष्ठसंस्था : २८८ • मूल्य– रु. ३२५/–
संपर्क : पृथ्वीराज विक्रम सावरकर
दूरध्वनी (०२२) २५३९४५०२




## –: अत्यंत कळकळीची विनंती :–

प्रतिष्ठानला देय शुल्क अथवा देणगी आपण IDBI बँकेच्या कोठल्याही शाखेत जाऊन, 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने IDBI बँक, दादर–प, या शाखेतील बचत खाते क्र. ०५०११०४०००००४३५१९ मध्ये रोख किंवा चेकने भरू शकता.

वरील खाते क्र. १६ आकडी असून सुरुवातीचा ० आकडा लिहिणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते किंवा आपल्या खात्यात परत येऊ शकते..

अशा प्रकारे रक्कम प्रतिष्ठानच्या खात्यात जमा केल्यावर आपले नाव, पूर्ण पत्ता, रक्कम व ती भरल्याचा दिनांक, चेक/NEFT/IMPS/ मोबाईल बँकिंगद्वारे दिली असल्यास त्याचा नंबर/संदर्भ क्र. तसेच ज्या कारणाने रक्कम भरली ते कारण आदी माहिती admin@marathepratishthan.org या ई–मेल वर अवश्य कळवावी म्हणजे पावती देणे सोपे होईल.

**BOOK POST**

**If undelivered, Please return to**

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१.**

त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२–२४१५०८८९
इ–मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**